



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२८५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव

### पदावरून हटवण्यासाठी विरोधकांची एकजूट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नवी दिल्ली**

सध्या सुरू असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान विविध मुद्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तिढा निर्माण झालेला आहे. दरम्यान राज्यसभेमध्ये सभापती जगदीप धनखड यांच्याविरोधात विरोधकांनी मोर्चेबांधणी केली असून, धनखड यांना पदावरून हटवण्यासाठी अविश्वास प्रस्ताव दाखल केला आहे. विरोधी पक्षांकडून आज दुपारी १ वाजून ३७ मिनिटांनी राज्यसभेच्या सेक्रेटरी जनरल यांच्याकडे याबाबतचा



प्रस्ताव दिला आहे. उपराष्ट्रपदी जगदीप धनखड यांच्याविरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावावर एकूण ६० सदस्यांच्या सह्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार विरोधी पक्षांनी घटनेतील कलम ६७-बी अन्वये धनखड यांना उपराष्ट्रपतीपदावरून हटवण्याची मागणी करत राज्यसभेमध्ये प्रस्ताव सादर केला आहे. हा प्रस्ताव राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असलेल्या उपराष्ट्रपतींना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी सादर करण्यात आला आहे. मात्र विरोधकांनी आणलेल्या या प्रस्तावावर सोनिया गांधी आणि अन्य कुठल्याही पक्षाच्या फ्लोअर लीडर्सच्या सह्या नाही आहेत.

काँग्रेसकडून जयराम रमेश आणि प्रमोद तिवारी यांच्यासह तृणमूल काँग्रेसचे नदीम उल हक आणि सागरिका घोष यांनी हा प्रस्ताव राज्यसभेच्या सेक्रेटरी जनरल यांच्याकडे सुपूर्द केला आहे. राज्यसभेचे सभापती असलेले जगदीप धनखड हे सभागृहात आपल्याला बोलू देत नाही, असा आरोप या प्रस्तावामधून विरोधी पक्षांच्या सदस्यांनी केला आहे. सभापती हे पक्षपाती भूमिका घेत वावरत असल्याचा आरोप करत विरोधी पक्षांकडून एका दिवसापूर्वीचं उदाहरण देण्यात आलं. विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सांगितलं की, ट्रेजरी बेंचच्या सदस्यांना बोलण्याची संधी देण्यात आली, मात्र जेव्हा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे बोलत होते, तेव्हा त्यांना रोखण्यात आलं.

## मुख्यमंत्री होताच देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडवर

### १.५ लाख सरकारी नोकऱ्यांची केली घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मुख्यमंत्रिपदाची सुत्रे हातात घेतल्यानंतर देवेंद्र फडणवीस हे ॲक्शन मोडवर आले आहेत. आपल्या सरकारची पुढील दिशा कशी असेल, याबाबत सोमवारी मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलंय. नोकरी-रोजगार उपलब्ध करण्यासाठी अनेक योजना राबवण्यासाठी त्यांनी रूपरेषा तयार केली आहे. दीड लाख नोकऱ्यांसाठी देवेंद्र फडणवीस यांनी आदेश दिले आहेत. टाइम्स ऑफ इंडियाने याबाबतचे वृत्त दिले आहे.

राज्यात विविध योजना राबवण्यासह तरूणांना सरकारी नोकरी मिळेल, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले.राज्यातील तरूणांसाठी लवकरच १.५ लाख रोजगार उपलब्ध करण्यात येतील, त्यासाठी भरती प्रक्रिया राबवण्यात यावी, असे आदेश त्यांनी सोमवारी दिल्याचं समोर आलेय. त्यामुळे लवकरच बंपर सरकारी नोकऱ्या



राज्यातील तरूणांसाठी उपलब्ध होतील, असे म्हटलंय जातेय.

'आधीच्या सरकारी कर्मचाऱ्यांची बढती प्रक्रिया पूर्ण करा. नंतर नवीन भरती प्रक्रिया पूर्ण करण्यास सुरूवात करा. तसेच नवीन भरती आणि विद्यमान कर्मचार्यांना डोमेन ज्ञान आणि तंत्रज्ञान अवलंबन यावर लक्ष केंद्रीत करणारे सर्वसमावेशक प्रशिक्षण मॉड्यूल विकसित करा, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.' सरकारी कर्मचाऱ्यांबद्दल बोलताना मुख्यमंत्री म्हणतात, 'सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक वेळ फिल्डमध्ये घालवावं लागेल. जिल्ह्यांमध्ये सचिवांच्या भेटींसाठी तपशीलवार वेळापत्रक तयार करा. सरकारी कार्यक्रम आणि उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी जिल्हास्तरीय समन्वय यंत्रणा मजबूत करा.'

**मंजूर झालेल्या प्रकल्पांमुळे १.२ लाख लोकांना मिळणार रोजगार**

गेल्या ८ महिन्यात मंजूर झालेल्या प्रकल्पांमधून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ३.३ लाख कोटी रूपयांची गुंतवणूक झाली आहे. यामधून १.२ लाख नोकऱ्या उपलब्ध होतील, असे राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी विधानभवनातील आपल्या भाषणात सांगितलं. ते म्हणाले, 'सेमीकंडक्टर, इलेक्ट्रिक वाहने, एरोस्पेस आणि डिफेन्स, केमिकल्स आणि पॉलिमर्स, लिथियम आयर्न बॅटरी अँड स्टील यांसारख्या हाय टेक प्रकल्पांना 'अँकर इंडस्ट्री'चे दर्जा देण्याचे धोरण सरकारने दिले आहे. ज्यामुळे लोकांसाठी रोजगार निर्माण होईल.'

## भाजपच्या विजयानंतर गौतम अदानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला

### सागर बंगल्यावर दोघांमध्ये दीड तास चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्योगपती गौतम अदानी यांची भेट भेट झाली आहे. फाडणवीस यांची भेट घेण्यासाठी गौतम अदानी हे सागर बंगल्यावर पोहोचले होते. राज्यातील उद्योगांच्या विकासासंदर्भात दोघांमध्ये चर्चा झाली असून सुमारे दीड तास ही चर्चा झाली असल्याची माहिती समोर आली आहे.



धारावी हा एक महत्त्वाचा प्रकल्प गौतम अदानी यांचा आहे. धारावी प्रकल्पावरून विरोधकांनी देखील गौतम अदानी यांच्यावर निवडणुकांच्या प्रचार काळात जोरदार टीका केली होती. याच धारावी प्रकल्पासंदर्भात देखील चर्चा झाली असल्याचे बोलले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी गौतम अदानी हे फडणवीस यांच्या 'सागर' या निवासस्थानी दाखल झाले होते.

उद्योगपती गौतम अदानी हे साधारण १०.३० च्या सुमारास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'सागर' या निवासस्थानी दाखल झाले होते. जवळपास दीड तास देवेंद्र फडणवीस आणि गौतम अदानी यांच्यात चर्चा झाली आहे. यात नेमकी काय चर्चा झाली हे अद्याप स्पष्ट नाही. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीला गौतम अदानी उपस्थित नव्हते. उद्योगपती अंबानी पासून ते बॉलीवूडमधील मोठे कलाकार मंडळी उपस्थित होते. यात गौतम अदानी मात्र उपस्थित नसल्याने ही सदिच्छा भेट देखील असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात अनेक मोठे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत, तर काही सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. तसेच महायुती व भाजपच्या नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारांवेळी धारावीचा चेहरामोहरा बदलणार व प्रत्येकाला राहण्यासाठी हक्काचे घर असणार असे आश्वासन दिले होते. या संदर्भात देखील अदानी आणि फडणवीस यांच्यात चर्चा झाली असू शकते. धारावी विकास प्रकल्प हा गौतम अदानी यांना मिळाला आहे. यावरून महाविकास आघाडीने देखील त्यांच्यावर टीका केली होती.

धारावी गौतम अदानी यांच्या घशात घालण्याचे काम महायुती करत असल्याची टीका महाविकास आघाडीकडून करण्यात येत होती. तसेच संपूर्ण महाराष्ट्रच गौतम अदानी यांना विकायचा असल्याचा आरोप देखील महाविकास आघाडीने केला होता. त्यामुळे निवडणुकीच्या प्रचारात गौतम अदानी हे नाव चर्चेत होते.

## शरद पवारांचा जन्म १०० शकुनी मेल्यावर झालाय

### भाजप आमदार पडळकरांची पवारांवर घणाघाती टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० मारकडवाडी**

राज्याचे लक्ष आज मारकडवाडीकडे लागलेल आहे. इथल्या काही बांधवांचे फोन आम्हाला आले आणि त्यांनी असे सांगितले की, मारकडवाडीतून एकच बाजू महाराष्ट्रासमोर जात आहे. मारकडवाडीतील लोकांना बॅलेट पेपरवर मतदान हव आहे, असं त्यातून सांगितलं जातंय. मात्र, खरंच इथल्या लोकांना बॅलेट पेपरवर मतदान हवं आहे का? माविआला कोणी मतदान केलंय का?



हे सर्वांना कळलं पाहिजे, म्हणून आम्ही मारकडवाडीत आलोत असं भाजप आमदार गोपीचंद पडळकर म्हणाले आहेत. ते मारकडवाडीत बोलत होते.

हे मारकडवाडी सर्वप्रथम कुणाल दिसलं. हे गाव माझ्या पै-पाहुण्यांचं गाव आहे. ९० टक्के येथे धनगर समाज राहतो. म्हणून माझी जबाबदारी वाढली आणि लक्षात आलं की इथे धनगरांनाच पुढं का करण्यात आलं? म्हणजे या महाराष्ट्रातला धनगर समाज लोकशाहीच्या प्रक्रियेतून जी निवडणूक पार पडते त्याच्या विरोधात आहे, असं वातावरण निर्माण करण्याचं महापाप शरद पवार यांनी केला आहे. म्हणून आज आम्ही मारकडवाडी मध्ये आलोत असंही पडळकरत म्हणालेत.

१०० शकुनी मेल्यानंतर एक शरद पवार जन्माला आले आहेत. यांचं डोकं बघा, धनगर समाज लोकशाही मनात नाही, असं भासवण्यात आलंय. या विधानसभेत १०० गाव असताना नेमकं माझ्याच मारकडवाडीला कां पुढे करण्यात आलं? हे लक्षात घेतलं पाहिजे. म्हणून आज सदाभाऊ खोत आणि मी या तुमच्या गावात आलो. त्याचबरोबर त्यांनी शरद पवारांवरही घणाघाती टीका केली आहे.

## शिवसेना अन् राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी थेट पुढच्या वर्षी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

गेल्या वर्षी शिंदे गटाच्या बंडखोरीनंतर ठाकरे गटात फूट पडली आणि उद्धव ठाकरे सरकार कोसळलं. त्यानंतर अजित पवारांनीही राष्ट्रवादी काँग्रेस फोडून सत्तेत सहभाग घेतला होता. याप्रकरणी ठाकरे आणि पवारांकडून आमदारांना अपात्र करण्यासंबंधी विधानसभा अध्यक्षांकडे याचिका दाखल केली होती. मात्र, त्यावर निर्णय न झाल्यानं सुप्रीम कोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर आता पुढच्या वर्षी सुनावणी होणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या गाईडलाईन्स नुसार, तत्कालीन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडून आमदार अपात्रता प्रकरणावर अंतिम निकाल येणं अपेक्षित होत. मात्र, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी आमदारांना अपात्र केलेलं नव्हतं आणि तातडीने निर्णयही दिलेला नव्हता. त्यामुळे दोन्ही गटांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सुप्रीम कोर्टातही तारखांमागून तारखा पडत होत्या. आता तर चक्क विधानसभेच कार्यकाळ संपवून नवीन विधानसभा अस्तित्वात आली.



दरम्यान, आता सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीची नवीन तारीख दिली. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रता प्रकरणाची पुढील वर्षी सुनावणी होणार आहे. या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयात ७ फेब्रुवारी २०२५ रोजी सुनावणी होणार आहे.

विधानसभेचे तत्कालीन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासमवेत असलेल्या आमदारांना अपात्र ठरवले नसल्याने ही याचिका दाखल करण्यात आली होती.

अर्थात या प्रकरणाला आता काही अर्थ उरलेला नाही. कारण ती विधानसभा संपून आता नवी विधानसभा अस्तित्वात आली आहे. तरीही या प्रकरणात पुढं काय होते किंवा न्यायालय दोषी ठरवलेल्यांना काही शिक्षा होऊ शकते का, हे पाहणं देखील महत्वाचं आहे.

**१७ डिसेंबरला सुनावणी**

अजित पवार यांना पक्ष आणि निवडणूक चिन्ह देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात शरद पवार यांच्या पक्षाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. जोपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागत नाही, तोपर्यंत शरद पवार यांच्या पक्षाला तुतारी वाजवणारा माणूस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष हे नाव कायम ठेवण्यास कोर्टाने परवानगी दिली. आता या प्रकरणाची सुनावणी १७ डिसेंबरला होणार आहे.

## महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराची तारीख १४ डिसेंबर?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुतीने सरकार स्थापन केले. आता सध्या खातेवाटप आणि मंत्रिमंडळ विस्ताराबद्दल चर्चा सुरू असून, अधिवेशनाआधी म्हणजे १४ तारखेला मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती समोर आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये खातेवाटपाचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे. आजतकने सूत्रांच्या हवाल्याने हे वृत्त दिले आहे.

विधिमंडळाचे अधिवेशन १६ डिसेंबरपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी मंत्रिमंडळ विस्तार होईल असे महायुतीतील नेत्यांकडून सांगितले जात होते. सूत्रांच्या




माहितीनुसार १४ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात काही मोठ्या नेत्यांचा समावेश केला जाणार नाही. गेल्या सरकारमध्ये काही कॅबिनेट मंत्र्यांची कामगिरी वाईट राहिली. त्यामुळे सरकारवर विरोधकांना टीका करण्याची संधी मिळाली, असे सूत्रांनी सांगितले.

**नव्या चेहऱ्यांना संधी?**

मागच्या सरकारमधील काही नेत्यांना मंत्रिमंडळातून बाहेर ठेवण्याबद्दल तिन्ही पक्षाचे एकमत झाले असल्याचे सूत्रांनी सांगितले. महायुती सरकारच्या नव्या मंत्रिमंडळात काही नवी आणि चांगली प्रतिमा असलेल्या आमदारांना संधी दिली जाण्याची शक्यता आहे. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांकडून वादग्रस्त मंत्र्यांना बाहेर ठेवण्याबद्दल जोर दिला जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**मंत्रिमंडळ विस्ताराचा फॉर्म्युला?**

महायुतीत तीन प्रमुख पक्ष आहेत. मंत्रिमंडळात मुख्यमंत्र्यांसह ४३ मंत्र्यांच्या समावेश असेल. भाजपकडून १५, शिवसेनेकडून १०, तर राष्ट्रवादी काँग्रेसचे ९ नेते मंत्रिपदाची शपथ घेतील, असे सूत्रांनी सांगितले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०मुंबई**

राज्यात नुकतेच विधानसभा निवडणुका पार पडल्या असून पुन्हा महायुतीचं सरकार स्थापन झालं आहे. त्यानंतर आता संपूर्ण राज्याला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका केव्हा होणार, याचे वेध लागले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका साडेतीन वर्षांपासून रखडलेल्या आहेत. सर्वच स्थानिक नेते या निवडणुकांच्या प्रतिक्षेत आहेत. दरम्यान महाविकास आघाडीच्या एका आमदाराने सोशल मीडिया पोस्ट करत या निवडणुका पुढे ढकलण्यात येणार असल्याची शक्यता वर्तवली आहे.



यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिपण्णी केली होती. न्यायालयाने सुनावणीत म्हटलं होतं की, निवडणुका घेण्यावर असलेल्या निर्बंधांसंदर्भात समाधानकारक कारण नसेल, तर निवडणुका घेण्याचे निर्देश देण्यात येतील. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर होतील, अशी शक्यता व्यक्त केली जात होती. परंतु अशातच आता आमदार रोहित पवार यांची सोशल मिडिया पोस्ट जास्तच चर्चेत आली आहे.राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, आणि नगरपालिकेच्या निवडणुका सातत्याने पुढे ढकलल्या जात आहेत. कोरोनाचा संसर्ग, ओबीसी आरक्षण या कारणांमुळे निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकर घेण्यासंदर्भात संकेत दिलेत. तर आमदार रोहित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यासाठी सुधारित अध्यादेश काढला जाणार असल्याचं म्हटलंय.

## संपादकीय ......

# फडणवीसांच्या नेतृत्वाखाली, विकास गतीमान होवो

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ५ डिसेंबर २०२४ एक अविस्मरणीय दिवस म्हणून नोंद होईल. महाराष्ट्राच्या लाडक्या देवाभाऊंनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून मुंबईच्या आझाद मैदानावर लक्षावधी जनसागराच्या साक्षीने शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच विविध राज्यांतील भाजपाचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्रीही या दिव्य-भव्य सोहळ्यास उपस्थित होते. या शानदार शपथविधी सोहळ्याने सन २०१४ च्या शपथविधी समारंभाची आठवण करून दिली. देवेंद्र पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, तेव्हाही असाच भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. खरं तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना युतीचे सरकार स्थापन करण्याचा राज्यातील मतदारांनी जनादेश दिला असताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लोभापायी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला व देवेंद्र यांची राज्याच्या सिंहासनावर बसण्याची संधी हुकली.

२०२४ मध्ये राज्यातील मतदारांनी राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाला निवडून दिले आहे. भाजपाने १४८ जागा लढवल्या, पक्षाचे १३२ आमदार विजयी झाले, शिवाय निवडून आलेल्या ५ आमदारांनी भाजपाला समर्थन जाहीर केले. त्यामुळे भाजपाच्या यादीवर आमदारांची संख्या १३७ झाली आहे. महायुतीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ५७ व अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार निवडून आले आहेत. याचा अर्थ राज्याचा मुख्यमंत्री भाजपाचाच व्हावा असाच जनादेश जनतेने दिला आहे. एकनाथ शिंदे व अजितदादांनीही तो स्वीकारला आहे. देवेंद्र हेच महाराष्ट्रात भाजपाचे नंबर १ चे नेते आहेत. देवेंद्र यांना पक्षात कोणीही स्पर्धक नाही किंवा त्यांना पर्यायही नाही. त्यांचे संघटनकौशल्य आणि परिश्रम याला तोड नाही. गेली अकरा वर्षे त्यांनी भाजपाचा राज्यात पाया भक्कम केला व राज्यात पक्षाचा विस्तारही सर्वाधिक केला. त्यामुळेच देवेंद्र हेच राज्यातील पक्षाचे सर्वोच्च व शक्तिमान नेतृत्व आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीचे २३५ आमदार विजयी झाले आणि महाआघाडीला पन्नाशीही गाठता आली नाही. महायुतीच्या झोळीत मतदारांनी मतांचा वर्षाव करून पाच वर्षे सरकार चालविण्याचा जनादेश दिला आहे. त्यामुळेच आता आपले काय होणार, या भयगंडाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना या तीनही पक्षांना पछाडले आहे. खरे तर विधानसभा निवडणुकीच्या काळात आघाडीतील तीनही पक्षांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पडत होती. त्यातही उबाठा सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे तर महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा असे वारंवार सांगत होते. भाजपाशी युती असताना शिवसेनेचे पन्नास-साठ आमदार निवडून येत होते, आता काँग्रेसशी युती करून उबाठा सेनेचे जेमतेम २० आमदार निवडून आले आहेत. जर सत्ता नसेल तर आपल्या पक्षाचे काय होणार, पक्ष कसा वाढणार या चिंतेने उबाठा सेनेला घेरले आहे. महायुतीच्या नवीन सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस यांची टीम कोण असणार याची सर्व राज्याला उत्सुकता होती व आजही आहे.

भाजपात नव्याने कोणाला संधी मिळणार, तरुणांना किती प्रतिनिधित्व मिळणार याचे अंदाज व्यक्त केले जात होते. अजित पवारांनी आपण तर शपथ घेणारच, पण शिंदे यांचे मात्र आपल्याला ठाऊक नाही, असे वक्तव्य केल्याने शिंदे नाराज असल्याच्या चर्चेला आणखी तोंड फुटले. आपले मुख्यमंत्रीपद गमावल्याचे दु:ख शिंदे यांना असणारच पण उपमुख्यमंत्री म्हणून गृहखाते मिळावे यासाठी त्यांचा आग्रह होता अशीही चर्चा होती. राजकारणात आपणहून काही मिळत नाही, खेचल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य करता येत नाही. पण शपथविधीच्या अगोदर चार तासांपर्यंत शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार की नाही यावर माध्यमांवर सवंग चर्चाच चालू होती. महायुतीला जनतेने एवढा मोठा जनादेश दिल्यानंतर रुसवे- फुगवे शेवटच्या क्षणापर्यंत चालू राहणे हे योग्य झाले नाही. शपथविधीसाठी महायुतीतील तीनही पक्षांनी जी निमंत्रणे पाठवली, त्यावर शिंदे यांचे नाव नव्हते. उपमुख्यमंत्री म्हणून शिंदे शपथ घेतील असा कोणत्याही निमंत्रणावर उल्लेख नव्हता. ही बाब सुद्धा खटकणारी आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेला विजय जसा महायुतीचा आहे, तसाच मोदी-शहा यांचाही त्यात मोठा वाटा आहे, याची जाणीव शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने ठेवली पाहिजे. महाघाडीचा नकारात्मक प्रचार व सत्तेसाठी नेत्यांमध्ये चाललेली चढाओढ जनतेला मुळीच आवडली नाही. दुसरीकडे महायुतीचा प्रचार हा विकासकामांचा अजेंडा घेऊन केला जात होता, लाडकी बहीण व ओबीसी यांना विश्वास देणारा होता.

भाजपाचे हायकमांड हे दिल्लीत आहेत. मोदी-शहा यांचा शब्द अंतिम आहे. तसे शिवसेनेत एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजितदादांचा निर्णय अंतिम आहे. मात्र भाजपाबरोबर पेच निर्माण झाला तर या दोन्ही पक्ष प्रमुखांना मोदी-शहांचेच ऐकावे लागणार आहे. दिल्लीतील श्रेष्ठींकडे दुर्लक्ष करून महायुतीच्या मित्रपक्षांना भाजपाला अडचणीत आणता येणार नाही. महाराष्ट्राची तुलना जशी मध्य प्रदेश, हरियाणा किंवा छत्तीसगडशी होऊ शकत नाही तसेच बिहारशीही होऊ शकत नाही, याचे भान महायुतीतील घटक पक्षांनी ठेवले पाहिजे. तीनही पक्ष आणि तीनही पक्षांचे नेते एकत्र राहिले, त्यांनी आपली एकजूट कायम ठेवली, तर त्यांचे व महाराष्ट्राचे त्यात भले आहे. गेल्या अडीच वर्षांत महायुतीच्या सरकारने राज्यात विकासकामांचा धडाका लावला, लाडक्या बहिणींना मोठा आधार दिला, असा कामाचा धडाका यापुढे चालू राहावा हीच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारकडून अपेक्षा आहे. लोकसभा निवडणुकीत झालेली चूक महाराष्ट्रातील मतदारांनी सुधारली आहे. देवेंद्र यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या नव्या सरकारकडून महाराष्ट्राचा चौफेर व गतीमान विकास होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

# टोमॅटो व मिरची पिकांत कीड व रोग सहनशील ह्या नवीन जाती विकसित

**दि.१०विदर्भप्रजासत्ताक**

वाण प्रसाराणासाठीच्या दिनांक ५ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या ३१व्या केंद्रीय उपसमितीच्या बैठकीत वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीच्या उद्यानविद्या संशोधन (भाजीपाला) केंद्राने विकसित केलेले टोमॅटो आणि मिरची पिकांच्या वाणांस महाराष्ट्र राज्यात लागवडीस राष्ट्रीय पातळीवर अधिसूचीत करण्यासाठी मान्यता देण्यात आली.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

१) मिरची (पीबीएनसी १७)

– हा वाण हिरवी मिरचीचे अधिक उत्पादन देणारा ५३१ ते ५४६ क्विंटल प्रति हेक्टर

– मराठवाडा विभागासाठी खरीप हंगामामध्ये लागवड करण्याची शिफारस.

– हा वाण लिफकर्ल व अँथ्राकनोझ रोगास मध्यम सहनशील आहे.

२) टोमॅटो (पिबीएनटी २०)

– हा वाण रबी हंगामामध्ये लागवड करण्याची शिफारस आहे.

– या वाणाची उत्पादन क्षमता ६१४ ते ६२० क्विंटल प्रति हेक्टर एवढी आहे.

– या वाणाच्या फळाचा आकार गोल व गडद्द लाल रंग असुन प्रति फळाचे वजण ६० ते ६५ ग्रॅम आहे.

– लागवडीनंतर ६० ते ६५ दिवसांनी फळाची पहीली काढणीस येते.

– हा वाण लिफकर्ल व फळामधील अळी, पांढरी माशी व फुलकिडे या किडींस मध्यम सहनशील आहे.

या वाणांच्या विकासासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इन्द्र मणि, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांचे महत्वपूर्ण सहकार्य आणि मार्गदर्शन मिळाल्याबद्दल शास्त्रज्ञानी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

मिरची आणि टोमॅटोच्या वाण विकासामध्ये डॉ. विश्वनाथ खंदारे, डॉ. आर. डी. बगीले, डॉ. आनंद दौंडे, डॉ. जी. एम वाघमारे, डॉ. व्ही. एस. जगताप, डॉ. एस. व्ही. धुतराज या शास्त्रज्ञांचे योगदान महत्वपूर्ण ठरले.

आरोग्य संपदा आहार विशेष

## पोट फुगणं आणि बद्धकोष्ठतेची समस्या झटक्यात होईल दूर, सोपा उपाय!

**दि.१०विदर्भ प्रजासत्ताक**

थंडीला सुरूवात झाली की, आरोग्यासंबंधी वेगवेगळ्या समस्याही डोकं वर काढतात. या दिवसांमध्ये इम्यूनिटी कमजोर होते. अशात वायरल इन्फेक्शनचा धोकाही वाढतो. त्यासोबतच पोटासंबंधी वेगवेगळ्या समस्याही होतात. कारण पचनक्रिया कमजोर होते. बऱ्याच लोकांना या दिवसात बद्धकोष्ठतेची म्हणजे पोट साफ न होण्याची समस्याही होते. काहीही खाल्लं तरी पोट फुगलेलं राहतं. बद्धकोष्ठतेची समस्या झाली तर ना काही खाण्याचं मन होत ना काही काम करण्याचं. तुम्हाला सुद्धा ही समस्या नेहमीच होत असेल तर आज आम्ही तुम्हाला एक आयुर्वेदिक उपाय सांगणार आहोत.



हिवाळ्यात बद्धकोष्ठतेची समस्या होण्याचं एक मुख्य कारण म्हणजे या दिवसांमध्ये पुरेसं पाणी न पिणे. त्याशिवाय कोणतीही फिजिकल ॲक्टिविटी न करणे हे सुद्धा या समस्येचं एक मोठं कारण आहे. जर आहारात फायबर कमी, तेलकट, मसालेदार पदार्थांचं अधिक सेवन, तणाव, गर्भावस्था, काही औषधांचं सेवन करत असाल तेव्हाही बद्धकोष्ठतेची समस्या होते.

राजस्थानचे आयुर्वेदिक वैद्य जगदीश सुमन यांच्यानुसार, बद्धकोष्ठतेची समस्या कुणालाही होऊ शकते. ही समस्या दूर करण्यासाठी एक सोपा आयुर्वेदिक उपाय आहे. ज्यासाठी तुम्हाला १०० ग्रॅम गुलकंद, १०० ग्रॅम छोटे बादाम आणि १०० ग्रॅम बडीशेपची गरज भासेल. यापासून बनवलेल्या पावडरने तुमची पोट साफ न होण्याची समस्या सहजपणे दूर होऊ शकते.

**बद्धकोष्ठता दूर करण्याचे इतर उपाय**

बद्धकोष्ठतेची समस्या दूर करण्यासाठी आहारात फायबर असलेल्या पदार्थांचा, फळांचा आणि भाज्यांचा समावेश करा. हिरव्या पालेभाज्या, कडधान्य, पपई, पेरू, ब्रोकली, ओट्सचं सेवन करा. दिवसभर भरपूर पाणी प्या. रोज थोडा वेळ व्यायाम करा किंवा पायी चला. या गोष्टींनी ही समस्या दूर होण्यास मदत मिळेल.

# महाराष्ट्र असिमीत ताकदीचे राज्य, पण थांबू नका!

## फ्लॅगशीप योजनांसाठी स्वतंत्र वॉररूम : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

### सरकारच्या आगामी काळातील वाटचालीची दिशा केली स्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई,** : महाराष्ट्र हे असिमित ताकदीचे राज्य आहे. आता आपण क्रमांक एकवर आहोत, म्हणून थांबू नका, असा मंत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या सचिवस्तरीय अधिकाऱ्यांना दिला. जुनी पुण्याई असली तरी नवी पुण्याई पुन्हा मिळवली पाहिजे, असे सांगतानाच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी पायाभूत सुविधांप्रमाणेच राज्य सरकारच्या फ्लॅगशीप योजनांसाठीही स्वतंत्र वॉररूम सुरु करण्याचे निर्देश यावेळी दिले. विधानभवन येथील समिती सभागृहात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आदी वरीष्ठ अधिकाऱ्यांची विशेष आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सरकारच्या आगामी काळातील वाटचालीची दिशा केली स्पष्ट केली. पारदर्शकता, गतिशीलता आणि प्रामाणिकता यावर अधिक भर द्या, असे नमूद करून, मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र सरकारच्या सहकार्याचा राज्याच्या प्रगतीसाठी पुरेपूर वापर करून घेतला पाहिजे. यासाठी अधिक समन्वय, पाठपुराव्याची व्यवस्था निर्माण करा. याकरिता नवी दिल्ली येथे महाराष्ट्र सदनाच्या माध्यमातून व्यवस्था उभी करा.

एक वॉररूम पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी आहेच. ही वॉररूम आणखी कार्यक्षम करा. कोणते प्रकल्प त्यात असले पाहिजे, याची मुख्य सचिवांनी नव्याने रचना करावी. या धर्तीवर राज्यातील केंद्र आणि राज्य सरकारच्या फ्लॅगशिप योजनांसाठी पण दुसरी वॉररूम आता असेल. त्यातून सर्वसामान्य लोकांपर्यत लाभ गतीने पोहोचले पाहिजे. यासाठी प्रयत्न करता येतील. यात जनता दरबार, लोकशाही दिन कार्यक्रम वेगाने हाती घ्या. हे कार्यक्रम सुरू झालेच पाहिजे, ते तळागाळात नेले पाहिजेत. आपले सरकार पोर्टल पुन्हा नव्याने पूर्ण क्षमतेने चालविण्यात यावे. जिल्ह्यांच्या पालक सचिवांनी आपआपल्या जिल्ह्यांचे तातडीने दौरे सुरु करावेत. पालक सचिवांनी आपल्या अनुभवाचा फायदा त्या-त्या जिल्ह्यांना करून देण्यावर भर द्यावा. वेगवेगळ्या विभागाचे पोर्टल अपडेट करा. ते अधिक प्रभावी करा. त्यातून लोकांना शक्य तितक्या सेवा घरबसल्या कशा मिळतील, यावर भर दिला पाहिजे. अर्थातच यात उत्कृष्ट काम करणाऱ्या विभागांना मंत्रिमंडळ बैठकीत सन्मानित करण्यात येईल, असेही मुख्यंत्र्यांनी सांगितले. राज्य शासनाची सर्व संकेतस्थळ हे आरटीआय फ्रेंडली करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. ते म्हणाले की, 'इज ऑफ लिव्हिंग'वर सर्वाधिक भर द्या. राज्यभरातून नागरिक सर्वाधिक कोणत्या कारणासाठी आपल्याकडे येतात आणि त्यांना त्या सेवा घरबसल्या कशा मिळतील, यावर भर देण्यासाठीचे नियोजन केले जावे. यासाठी सहा-सहा महिन्याचे दोन टप्पे करून उद्दिष्ट गाठता येईल. यासाठी निवृत्त अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा फायदा घेता येईल, त्यासाठी त्यांची एक समिती गठित करून अभ्यास अहवाल तयार करण्यात यावा. कर्मचाऱ्यांच्या तक्रारींकडे प्राधान्याने लक्ष देण्यात यावे. त्यांचा थेट सचिवांशी संवाद व्हावा आणि त्यातून त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे, यावर भर देण्यात यावा. नवीन नियुक्त कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्यांना त्यांच्या सेवेशी संबंधित जिल्ह्यात पदस्थापना दिल्या जाव्यात. जेणेकरून त्यांना काम करणे सोपे होईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.



नागरिकांना सुविधा देण्यासाठी तसेच, प्रशासकीय कामांसाठी तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करण्याची सूचना देऊन मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी प्रत्येक विभागाने शंभर दिवसांचा कार्यक्रम तयार करून तो सादर करावा, असे निर्देशही दिले.

# विभागीय लोकशाही दिनात १३ प्रकरणांवर सुनावणी

## प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे –विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

**दि.१०अमरावती,** नागरिकांकडून प्राप्त अर्जावर विहित कालमर्यादेत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

विभागीय लोकशाही दिनाकरिता दाखल प्रकरणांचा संबंधित विभागाकडून वेळेत अहवाल प्राप्त करुन प्रकरणांचा तत्काळ निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांनी सर्वंकष प्रयत्न करावे. तसेच केलेल्या कार्यवाहीबाबत संबंधित तक्रारदारांना लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी दिले.

यावेळी लोकशाही दिनात दाखल एकूण १३ प्रकरणांवर चर्चा करुन त्यानुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित विभागाला दिल्या.



विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात डॉ. पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली आज लोकशाही दिनाचे कामकाज पार पडले. याप्रसंगी त्या बोलत होते. अपर आयुक्त गजेंद्र बावणे, उपायुक्त संतोष कवडे यांच्यासह पोलीस, महापालिका, महसूल, सहकार, कृषी, जलसंधारण व ऊर्जा विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. सामान्य प्रशासन विभागाव्दारे सादर करण्यात आलेल्या ६ स्वीकृत अर्ज (प्रलंबित प्रकरणे) व ७ अस्वीकृत अर्ज (सामान्य तक्रार अर्ज) अशा एकूण १३ अर्जावर सविस्तर चर्चा आजच्या विभागीय लोकशाही दिनात झाली. तसेच आजच्या विभागीय लोकशाही दिनात दोन नवीन प्रकरणे दाखल झालीत.यावेळी उपस्थित तक्रारदारांचे म्हणने ऐकूण घेण्यात आले. प्रलंबित प्रकरणांचा तत्काळ निपटारा करण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देशही विभागीय आयुक्तांनी संबंधित विभागांना यावेळी दिले.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून रोहयो योजनेचा सविस्तर आढावा

## 'मनरेगा'च्या कामाला गती द्या- जिल्हाधिकारी अजित कुंभार



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अकोला–** जिल्ह्यात 'मनरेगा'ची कामे व्यापक स्वरूपात होणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मितीबरोबरच विकास कामांना देणारी ही महत्त्वपूर्ण योजना आहे. त्यामुळे 'मनरेगा'मध्ये अधिकाधिक कामे राबवावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांच्या अध्यक्षतेत मनरेगा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात झाली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैष्णवी बी, निवासी उपजिल्हाधिकारी तथा उपजील्हाधिकारी रोजगार हमी योजना विजय पाटील, सामाजिक वनीकरण विभागाचे वन अधिकारी, तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे उपवनसंरक्षक डॉ कुमार स्वामी उपस्थित होते.

योजनेत वैविध्यपूर्ण व नाविन्यपूर्ण कामे व्यापक स्वरूपात राबवली जाणे आवश्यक आहे. मात्र संबंधित यंत्रणा सामाजिक वनीकरण विभाग, कृषी विभाग आदींकडून पुरेशी कार्यवाही झालेली नाही. त्यात तत्काळ सुधारणा करावी.

सार्वजनिक बांबू लागवडीबरोबरच इतर कामांना चालना द्यावी. अधिकाधिक रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. कुंभार यांनी दिले.यावेळी त्यांनी कुरण लागवड, तुती(रेशीम) लागवड, सिंचन विहिरी, फळबाग लागवड, पाणंद रस्ते यासह विवीध बाबींचा आढावा घेतला.

वनविभाग, सामजिक वनीकरण, कृषी विभाग व सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.मनरेगा अंतर्गत ३०१ ग्रामपंचायत स्तरावर ६ हजार ७१० मजुरामार्फत १ हजार ५८४ ठिकाणी सध्या कामे सुरू असून ३७७ कामे अकोला, ३०० पातूर, २१६ अकोट, २१८ मुर्तिजापूर,१९३ बाळापूर तर १९२ कामे बार्शीटाकळी तालुक्यात सुरू आहेत.

वैयक्तिक व सार्वजनिक बांबू लागवड अंतर्गत जिल्हयात २७३ हेक्टर क्षेत्रफळावर ४६५ कामे सद्य:स्थितीत सुरू आहेत.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १० डिसेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# ग्रामसेवकांचे कर्तव्य पंचायत समिती की गावपातळीवर ?

## बहुतांश ग्रामसेवकांनी गाव सोडले वाऱ्यावर

### ग्रामसेवकांवर वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पुर्णपणे दुर्लक्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अंजनगाव सुर्जी** – ग्रामीण भागातील ग्रामपंचायत स्तरावरील कामकाजात सुसूत्रता आणणे आणि नागरिकांची गैरसोय टाळण्याच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, व ग्रामविकास अधिकारी शासनाने नेमलेले आहेत.अंजनगाव पंचायत समिती अंतर्गत ४९ ग्रामपंचायती असुन ३४ ग्रामसेवक आहेत काही ग्रामसेवकांकडे एका तर काही कडे दोन तीन ग्रामपंचायतींचा प्रभार आहे. अंजनगाव तालुक्यातील बहुतांश ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी हे आपल्या ग्रामपंचायत कार्यालयात कमी तर पंचायत समितीच्या परिसरातुनच गावांचा कारभार सांभाळत आहेत.सरकारी कर्मचाऱ्यांना कार्यालयीनची वेळ ही ९:४५ ते ६:१५ आहे परंतु बहुतांश तालुक्यातील ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी ११ ते १२ वाजता कर्तव्यावर असलेल्या गावात फेरफटका मारून दोन वाजता पासुन सहा वाजेपर्यंत पंचायत समितीच्या आवारात कंत्राटदारांसोबत देवाणघेवाण च्या गप्पांमध्ये गुंतलेले असतात. तालुक्यातील बहुतांश गावातील नागरिकांसह विद्यार्थ्यांना ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या शोधात तालुक्यांचे ठिकाण गाठावे लागते.

शासनाने कर्मचारांना व अधिकाऱ्यांना आठ तास कार्यालयीन कामकाज करण्यासाठी घरभाडे भत्तासह लाखो रुपायाचा पगार देत आहे.ग्रामसेवक हा गावांचा प्रशासनाने नेमणूक केलेला महत्वाचा अधिकारी असुन गाव विकासासाठी आवश्यक आहे. अंजनगाव सुर्जी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक, व ग्रामविकास अधिकारी यांच्यावर कर्तव्याची सक्ती करुन पुर्णवेळ कार्यालयात उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात यावे अशी मागणी गावकरी करत आहे

### ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रिक उपकरणे गरजेचे

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठी बायोमेट्रिक अनिवार्य केल्यास ते नियोजित वेळेत कार्यालयात हजर राहतील. त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेच्या कामांना गती मिळून काम सुलभ व जलद गतीने होतील अशी अपेक्षा ग्रामीण भागातील नागरिक करीत आहे

# जॉर्ज सोरोस काय काँग्रेसचा सगा लागतो का?



## डॉ. अनिल बोंडे यांनी राज्यसभेमध्ये विचारला सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०नवी दिल्ली–** आज राज्यसभेमध्ये २६७ कलमांच्या अन्वये लक्ष्मीकांत जी वाजपेयी कविता पाटीदार आणि सुधांशू त्रिवेदी यांनी उपस्थित केलेल्या चर्चेवर चर्चा व्हावी यासाठी भारतीय जनता पक्षाचे सर्व खासदार आक्रमक झालेले होते. परंतु वारंवार गोंधळ झाल्यानंतर सुद्धा ही चर्चा होऊ शकली नाही कारण काँग्रेसचे सर्व खासदार या चर्चेला विरोध करत होते. ही चर्चा व्हावी याकरिता डॉक्टर बोंडे यांनी सभापती श्री जगदीप धनखड जी यांचे माध्यमातून प्रश्न उपस्थित केला की जॉर्ज सोरोस हा काँग्रेसचा नातेवाईक लागतो का? ही चर्चा थांबवण्याकरिता काँग्रेस का प्रयत्न करीत आहे? आणि यामुळे सभागृहात खळबळ उडाली.जॉर्ज सोरोस हा अरबोपती अमेरिकन संपूर्णतः भारताला व भारताचे लोकशाही शासन अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहे. ब्रिटन बांगलादेश मध्ये सुद्धा सत्ता उलटवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. भारताची संपूर्ण अर्थव्यवस्था ढासळून टाकण्याकरिता जॉर्ज सोरोस सातत्याने प्रयत्नशील आहे. आणि या सोरोस च्या माध्यमातून काँग्रेसच्या सह अध्यक्षा असलेल्या सोनिया गांधी या संस्थेला भरपूर पैसा प्राप्त झालेला आहे. जॉर्ज शुभेच्छा या देश विरोधी कार्यवाह्यामुळे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शासनाला लोकशाहीने निवडून आणलेले आहे. आपल्या शासनाला धोका निर्माण करण्याचा प्रयत्न काँग्रेसने सोरोस माध्यमातून सातत्याने केलेली आहे. जॉर्ज सोरोस च्या देश विरोधी कार्यवयावर भाजपचे खासदार सुधांशू त्रिवेदी यांनी वारंवार सूर ओढले आहेत. लोकसभेमध्ये सुद्धा अनेक खासदारांनी यावर प्रश्न उपस्थित केलेले आहे. त्याचप्रमाणे जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस व काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांचे काय संबंध आहेत यावर चर्चा करण्याकरता २६७ कलमान्वये प्रस्ताव मांडण्यात आला. प्रस्तावावर चर्चा होऊ द्यायचेच नाही असे काँग्रेसचे विरोधी पक्षनेते मलिक्कार्जुन खरगे त्याचप्रमाणे काँग्रेसच्या सर्व खासदारांनी चंग बांधला होता. आणि ही चर्चा झालीच पाहिजे आणि देशाला जॉर्ज सोरोस आणि सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्या देश विघातक कार्याचा भांडाफोड होऊन जनतेला माहीत झाल्या पाहिजे. काँग्रेसच्या सत्तापिसूपणामुळे देशाला कसा धोका निर्माण झालेला आहे आणि जॉर्ज सोरोस च्या माध्यमातून पैसा आणून निवडणुकांमध्ये त्याचप्रमाणे आंदोलनाच्या माध्यमातून देशामध्ये गोंधळ माजवण्याचा प्रयत्न जो केला जातो त्यावर चर्चा झाली पाहिजे हा भाजपच्या सर्व खासदारांचा आग्रह होता. आणि म्हणून सभापती जगदीप जी धनखड च्या परवानगीने राज्यसभा खासदार डॉक्टर अनिल बोंडे त्यांनी हा प्रश्न विचारला की, जॉर्ज सोरोस हा काँग्रेसचा नातेवाईक आहे का? काँग्रेस चर्चेला का घाबरतात? परंतु काँग्रेसने केलेल्या विरोधामुळे शेवटपर्यंत ती चर्चा होऊ शकली नाही. काँग्रेसने कितीही पडदा टाकण्याचा प्रयत्न केला तरी संपूर्ण भारतामध्ये व भारतातील जनतेला काँग्रेस देश विरोधी तत्त्वाच्या सोबत कशी जोडलेली आहे हे मात्र आजच्या राज्यसभेतील कामकाजामुळे सर्व जनतेला कळलेले आहेत.

# मॉर्निंग चषक २०२४ टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा खेळपट्टीचे भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० अमरावती** २शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंती उत्सवानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्था कर्मचारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्वर्गीय श्री उपाख्य दादासाहेब काळमेघ व स्वर्गीय श्री प्रशांत उर्फ गोटूभाऊ चांदुरकर, स्व. चैतन्य संतोष रामेकर, स्व.रामभाऊ विठोबाजी ठाकरे, स्व.बेबीताई देविदास भोंड, स्व. मधुकरराव सगणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ अमरावती शहरातील रुलर इन्स्टिट्यूट क्रीडांगण पंचवटी चौक अमरावती दिनांक २०डिसेंबर २०२४ ते २५ डिसेंबर २०२४ दरम्यान लीग पद्धतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक ७१ हजार, द्वितीय पारितोषिक ५१ हजार, तृतीय पारितोषिक ३१ हजार व इतर प्रोत्साहनपर बक्षिसे समाविष्ट आहेत.दरवर्षीप्रमाणे यंदाही मॉर्निंग चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा ज्याची विदर्भ तसेच महाराष्ट्रभर चषकाची ख्याती आहे. या स्पर्धेची प्रतीक्षा महाराष्ट्रातील अनेक खेळाडू आतुरतेने वाट पाहत असतात अशा चषकाच्या खेळपट्टीचे भूमिपूजन आज दिनांक ९ डिसेंबर २०२४ रोजी संपन्न झाले. या भूमिपूजनात अमरावती येथील वेलकम ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य यावेळेस भूमिपूजनासाठी प्रमुख अतिथी म्हणून आवर्जून उपस्थित होते वेलकम ग्रुप जेष्ठ मंडळ सन्माननीय सदस्य मनोहर माहोरे, मधुकर ढेवले,नामदेव बांदरे, विनायक रोडे, रुपराव तालन, राजेंद्र किसवे, भांगे साहेब तथाप्रशांत गुल्हाने तालुका कृषी अधिकारी व मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावतीचे सर्व सन्माननीय सदस्य यावेळेस आवर्जून उपस्थित होते.

या चषकाच्या यशस्वीतेसाठी मॉर्निंग क्रिकेट क्लब अमरावतीचे सर्व सन्माननीय सदस्य स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अहोरात्र परिश्रम घेतात त्यामुळे या चषकाला विदर्भातच नव्हे तर महाराष्ट्रात ख्याती प्राप्त झाली आहे.यावर्षी या चषकात मुंबई, छत्रपती संभाजीनगर, चिखली (बुलढाणा), यवतमाळ, नागपूर येथील संघ प्रवेशित होणे अपेक्षित आहे. तसेच अमरावतीतील दिग्गज संघ या चषकात सहभागी होतात. त्यामुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरते व अमरावतीच्या क्रिकेट प्रेमींसाठी आकर्षणाचे केंद्रस्थान ठरते.


# मेळघाटातील आदिवासींचे रोजगारासाठी कुटूंबासह स्थलांतरण

## पिकअप व्हॅनव्दारे जथ्थेच्या जथ्थे बाहेर जाताहेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मेळघाट** – विधानसभा निवडणूकीत मतदान करण्यासाठी परप्रांतातून मेळघाटात दाखल झालेले मजुर आता क्रमाक्रमाने स्थानांतरण करत असल्याने यावर्षी रोजगारसाठी धारणी व चिखलदरा तालुक्यात विक्रमी पलायन झालेले आहे. दुसरीकडे मेळघाटात ५५ हजार मजुर एमआरईजीएसच्या कामावर हजर असल्याने मंजूरांची संख्या फुगलेली दिसत आहे.

खरीप पिकांची कापणी दिवाळी, विधानसभा निवडणूक आणि रब्बी पिकांची परेणी आटोपताच मेळघाटातून दररोज २० ते २५ पिकअप व्हॅन भरून आदिवासी कुटूबांसह पश्चिम महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि महानगरांकडे कामासाठी पलायन सुरू झालेले आहे. मतदानाचा हक्क बजावण्यासाठी हजारो कि.मीचा प्रवास करून आदिवासी मजुरांनी मेळघाटात गाठलेले होते. परिणामीमतदानाची टक्केवारी जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे ७२ टक्के पेक्षा जास्त मतदान संपन्न करून आदिवासींनी लोकतंत्रावरील आपली आस्था प्रदर्शित केलेली असली तरी महात्मा गांधी ग्रामीण रोजगार योजना कायद्यानुसार रोजगाराचा



हक्क त्यांना मिळालेला नाही. सालाबादा प्रमाणे मेळघाटातून राज्याच्या महानगर, पश्चिम महाराष्ट्र, मध्यप्रदेश, राजस्थान व इतर भागात शेतीची कामे, उस कापणी आणि औद्योगीक मजुरीला तथा विट भट्टयांवर कामासाठी जातात. मात्र, यावर्षी खरीप पिके म्हणजे सोयाबीन, मका, धान, उडीद व ज्वारीने धोका दिल्यामुळे विक्रमी स्थलांतरण होत आहे. पश्चिम महाराष्ट्रात उस तोडणीसाठी जाणारे मजुर धुळघाटरेल्वे मार्गे पिकअप व्हॅनव्दारे जातांना शासकीय स्थानिक कर्मचारी, ग्रामसेवक, पटवारी, कृषी सेवक, राजेगारसेवक यांना दिसत नाही, हा एक संशोधनाचा विषयविषय आहे. मेळघाटसह आदिवासी भागातील कुपोषण, बालमृत्यू, माता–मृत्यू, नापिकी, शहरीकरण आणि शेतीसाठी प्रतिकुल हवामानामुळे ग्रामीण भागात रोजगाराची समस्या साल दरसाल वाढतच असल्याने शासनाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार अमंलात आलेला होता. मागील त्यांना रोजगार वप्रत्येक हाताला काम देण्याचीएमआरईजीएस ग्रामीण भागात योजना लागू करण्यात आली. अमरावती जिल्ह्यातील आदिवासी उपाययोजनेतील (टीएसपी) धारणीवचिखलदरा या दोन तालुक्यात आठ महिने रोजगार उपलब्ध करण्यात आलेला आहे. सध्या धारणी तालुक्यात २१ हजार मजूर शासकीय कामावर असून चिखलदरा भागात ३५ हजार मजूर कामकरित असल्याची माहिती आहे. चिखलदऱ्याच्यातुलनेत धारणी तालुक्याची जनसंख्या दुप्पट असून रोजगाराची कामे कमी प्रमाणात असल्याने मजूरांचे कुटूंब पलायन धारणी भागात जास्त वाढत आहे. मुख्यमंत्री मेळघाटचे लाडके देवेंद्र फडणवीस यांनी मेळघाटच्या स्थलांतरणावर लक्ष देऊन शेतीपुरक रोजगार योजना, शेतीचा दर्जा, उपाययोजनांसाठी अनुदानित योजना, सहकार तत्वावर दुध डेअरी व तत्सम उद्योग, वनविभागाव्दारे रोपवने, कृषीविभागाव्दारे फळबागव गॅबियान बंधारेसह विविध उपायोजना राबविण्याची गरज आहे.

# बडनेरा येथील मिलचाळ परिसरातील नागरिकांना अपुरा पाणीपुरवठा

### संतप्त नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०बडनेरा–** बडनेरा नवी वस्तीतील मिलचाळपरिसरातील नागरिकांना गेल्या दोन ते तीन वर्षापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ढिसाळ व नियोजन शुन्य कारभारामुळे पाण्याचा पुरवठा अनियमित व अपुरा होत आहे. त्यामुळे नागरिक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विरोधात रोष व्यक्त करत असून पाण्याची समस्या निकाली काढली नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारासुद्धा दिला आहे.गेल्या अनेक वर्षापासून बडनेरा शहरातील नवी वस्ती परिसरात मिलचाळ येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून अनियमित व अपुरा पाणीपुरवठा होत आहे. नागरिकांना पाण्यासाठी वनवन भटकावे लागत आहे. त्यामुळे अनेकदा नागरिकांना हातपंपाच्या दूषित पाण्याचा वापर करावा लागत आहे. नागरिकांची पाण्याची समस्या दूर करण्याकरिता नव्यानेच जलवाहिनी टाकण्यात आली. तरीसुद्धा पाण्याची समस्या कायम आहे. त्यामुळे परिसरातील शेकडो महिला व पुरुष मजीप्रावर संताप व्यक्त करीत आहेत. रस्त्यावर उतरून महिलांनी सामाजिक कार्यकर्त्यांसह पाईपलाईन काढण्याचा प्रयत्नही केला, मात्र काही समजूतदार लोकांच्या माध्यमातून त्यांच्या संतप्त भावनांना आवर घालीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांशी भ्रमणध्वनीवर बोलणी करून संबंधित अधिकाऱ्यांना अल्टीमेटम देण्यात आला आहे. याप्रसंगी युवा स्वाभिमानी पक्षाचे बडनेरा शहराचे कार्यकर्ते अजय जैस्वाल, सिद्धार्थ बनसोड, माजी नगरसेवक प्रकाश बनसोड, प्रहारचे उमेश मेश्राम, तसेच मिलचाल परिसरातील अनेक नागरिक उपस्थित होते.


# धारणीतील शिक्षकाचा शिक्षिकेवर जबरीने बलात्कार

### शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अमरावती–** धारणी तालुक्यात कार्यरत असलेल्या विवाहित शिक्षकाने पत्नीशी लवकरच घटस्फोट घेणार असल्याचे सांगून एका अविवाहित शिक्षिकेला लग्नाचे आमिष देऊन तिला शेगावात नेले आणि तेथे तिच्यावर जबरीने बलात्कार केला. याबाबत शेगाव शहर पोलिस ठाण्यात शिक्षकावर गुन्हे दाखल करण्यात आला आहे.

अंकित हुकुमचंद मालवीय, रा. जयस्तंभ चौक, धारणी, जि. अमरावती असे गुन्हे दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.



माहितीनुसार अंकीत मालवीय हा धारणी तालुक्यातील एका शाळेवर शिक्षक असून तो विवाहित आहे. पिडीत शिक्षिका देखील धारणी तालुक्यात शिक्षिका म्हणून कार्यरत असून तिची अंकित सोबत ओळख होती. अंकीतने पत्नीपासून लवकरच घटस्फोट होणार असल्याची खोटी स्टोरी सांगून शिक्षिकेला जुलै २०२४ मध्ये विवाहाचे आमिष देऊन दिले. पिडीतेला अंकीत हा आवडत असल्याने ती सुध्दा लग्रास तयार होती. याचाच फायदा घेत अंकीतने शिक्षिके सोबत अनेकवेळा शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. परंतु, पिडीतेने विवाहापूर्वी अशा संबधांना नकार दिला. त्यामुळे अंकीत हा ७ डिसेंबर रोजी पिडीतेला घेऊन शेगावला गेला आणि दोघेही एका रूममध्ये थांबले. रूममध्ये अंकीतने पुन्हा शिक्षिकेशी शारीरिक संबंध करण्याचा प्रयत्न केला. परंतु शिक्षिकेने नकार देतात यावेळी अंकीतने शिक्षिकेसोबत जबरीने बलात्कार केला. त्यानंतर त्याने रात्रभर पिडीतेचे लैगींक शोषण केले. अंकीतपासून सुटका होताच पिडीतेने शेगाव शहर पोलिस ठाणे गाठून आपबीती सांगितली त्यानंतर पोलिसांनी तक्रार दिली.

# नाल्यामध्ये बस अडकून २५ प्रवासी गंभीर जखमी

## अपघातानंतर वाहक व चालक खासगी वाहनातून निघून गेले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मलकापूर पांग्रा** – महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची चिखली आगाराची बस चिखली येथून मलकापूर पांग्रा कडे जात असताना वाघाळा येथून मलकापूर पांग्रा कडे येत असताना नाल्यात उलटून अडकली. या अपघातात २५ प्रवासी जखमी झाले असून त्यांच्यावर मलकापूर पांग्रा येथील प्राथमिक उपचार केंद्रात उपचार सुरु आहे. ही घटना आज ९ डिसेंबर रोजी सायंकाळी



घडली. स्टिअरींग फ्री झाल्याने ही दुर्घटना घडली असली तरी नाल्यामुळेच मोठी अप्रिय घटना टळली.

एम एच ४० एन ९५८४ या क्रमांकाची चिखली आगाराची बस चिखली मार्गे वाघाळा किनगाव जट्टू ही वाघाळ्यावरून मलकापूर पांग्राकडे जात होती. दरम्यान चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस कैलास सोनवणे यांच्या शेताजवळ रस्त्याच्या बाजूला मोठ्या नालीत बस पलटली. त्यामध्ये ४४ प्रवाशी होते. यापैकी जखमी प्रवाशांच्या पायांना, तोंडाला व डोक्याला मार लागला.

# अहो आश्चर्य.... मुंबई झाले थंड हवेचे ठिकाण,

## पारा १३वर; महाबळेश्वरलाही टाकले मागे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०मुंबई : –** दमट हवा आणि सतत घामाच्या धारांना सरावलेल्या मुंबईकरांना थंडीचे मोठे अप्रूप. त्यामुळे हिवाळ्याची ते आवर्जून वाट पहात असतात. दिवाळीनंतर आलेल्या थंडीने या महानगरात बस्तान बसवले असे वाटत असतानाच पुन्हा गरमीने डोके वर काढले होते. मात्र, या गरमीवर मात करून आता पुन्हा थंडी परतली असून, मुंबईचा पारा चक्क १३ अंश सेल्सिअसपर्यंत घसरला आहे.

उत्तरेकडून येणाऱ्या शीतलहरीचा हा परिणाम असून, झोंबणारी ही थंडी मुंबईकरांना आणखी काही दिवस अनुभवायला मिळणार आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि हिमालयीन पर्वत रांगांतून दक्षिण भारताकडे वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे थंडी परत आली असून, राज्यातील अनेक शहरांच्या किमान तापमानाचा पारा खाली घसरला आहे.

विशेष म्हणजे मुंबईचे तापमान १३, तर महाबळेश्वरचे



१५ असून, वाढत्या थंडीमुळे मुंबईकरांना आल्हाददायक वातावरणाचा मनमुराद आनंद लुटता येत आहे.

२४ डिसेंबर २०१५ रोजी मुंबईचे किमान तापमान ११.४ होते. त्यानंतर ९ वर्षे डिसेंबरमध्ये पारा एवढ्या खाली घसरला नव्हता. यंदा मात्र डिसेंबरच्या सुरुवातीलाच पारा चक्क १३ अंशांपर्यंत खाली आला असून, ही नोंद १३.७ आहे. पुढील दोन ते तीन दिवस मुंबईकरांना गारेगार वातावरणाचा आनंद लुटता येईल.

**– अथ्रेया शेट्टी,** हवामान अभ्यासक

# आकाशात १३, १४ डिसेंबरला उल्का वर्षाव!

## फेथेन लघुग्रहाचे वस्तू कण उल्का रूपात पाहण्याची खगोलप्रेमींना संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अकोला–** डिसेंबर महिन्यात १३ व १४ डिसेंबरच्या रात्री खगोलीय घटना घडणार आहे. ही घटना डोळ्याने पाहता येणार आहे. आकाशात पूर्व दिशेला उल्का वर्षाव होणार आहे. या उल्का वर्षावाला जेमिनिड्चा उल्का वर्षाव म्हणतात. हा उल्का वर्षाव लघुग्रह व ३२०० फेथॉन नावाच्या छोट्याशा खगोलीय वस्तूंमुळे होतो. फेथेन लघुग्रहाचे वस्तू कण उल्कांचे रूपात पडताना पाहता येतील. खगोलीय हेमंत ऋतूतील गुलाबी थंडीत मिथुन राशीतील उल्का वर्षाव पूर्वेच्या समृद्ध आकाशात रात्री नऊनंतर सुरू होऊन पहाटेपर्यंत बघता येईल,अशी माहिती विश्वभारती केंद्राचे संचालक प्रभाकर दोड यांनी दिली.

निरभ्र रात्री आकाशात अचानक एखादी प्रकाशरेषा क्षणार्धात चमकून जाते यालाच आपण तारा तुटणे असे म्हणतो, परंतु या घटनेचा ताऱ्यांशी काहीएक संबंध नसतो. तर ती उल्का असते. येत्या १३ व १४ डिसेंबरच्या रात्री आकाशातील ग्रह ताऱ्यांच्या समृद्ध भागातील मिथुन राशीत दरताशी सरासरी १२० वेगाने उल्का पडतील.

सूर्यकुलाचेच घटक असलेले धुमकेतू, ग्रह, लघुग्रह वा उपग्रहांदीचे वस्तू कण भ्रमण




कक्षेत विखुरलेल्या स्वरुपात असतात. जेव्हा पृथ्वी या कणांजवळून फिरते तेव्हा या वस्तू गुरुत्वाकर्षणाने ओढल्या जाऊन घर्षणामुळे पेट घेतात व त्यांच्या उंची व घटकांप्रमाणे लाल, पिवळ्या, पांढऱ्या व निळ्या रंगात चमकताना दिसतात. बहुतांशी उल्का वातावरणातच नष्ट होतात. एखादी पूर्णांशाने न जळता पृथ्वीवर येऊन आदळते तिला अशनी म्हणतात.

पौर्णिमेच्या पूर्ण चंद्राजवळ उल्कांचे उगमस्थान असल्याने उल्कांची तेजस्वीता काहीशी कमी दिसेल. निवांत जागी झोपलेल्या स्थितीत बघणे सोयीचे होईल. याचवेळी दोन्ही दिवशीचे पहाटे इंटरनॅशनल स्पेस स्टेशन अर्थात फिरत्या चांदणीचा आकाश नजारा पहिल्या दिवशी ६:०९ ते ६:१५या वेळेत पश्चिम ते उत्तर बाजूस तर दुसऱ्या दिवशी पहाटे ५:२४ ते ५:२६ या वेळेत उत्तर आकाशात स्पेस स्टेशन पाहता येईल.

'तारा तुटणे' नव्हे, तर उल्का वर्षाव या वर्षी अनेक खगोलीय घटना घडल्या. यात चंद्र ग्रहण, सूर्य ग्रहण यांचा समावेश आहे. त्याच बरोबर या वर्षाच्या शेवटी डिसेंबर महिन्यात उल्का वर्षाव नागरिकांना पाहता येणार आहे. हा उल्का वर्षाव खगोलप्रेमी व अभ्यासकांना साध्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. रात्री आकाशाचे निरीक्षण करताना काही क्षणात प्रकाशरेषांचा वर्षाव आकाशात दिसणार आहे. अनेक जण या घटनेला 'तारा तुटने' असे म्हणतात. मात्र, प्रत्यक्षात तारा कधीच तुटत नसून या घटनेला उल्का वर्षाव म्हटले जाते.

# वाघ नखे जप्तीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांवर ग्रामस्थांचा हल्ला, वन विभागाच्या गाडीच्या काचा फोडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०अकोट १६**

आदिवासी बहुल बल्लारखेड गावात वन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या कारवाईच्या पद्धतीवरून ग्रामस्थांमध्ये असंतोष निर्माण झाल्याचे ८ डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेवरून दिसून येत आहे. रात्री आरोपीच्या शोधत आलेल्या वन विभागाच्या एका वाहनावर संतप्त जमावाने दगडफेक करून वाहनांच्या काचा



फोडल्या होत्या. परिणामी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना पळ काढावा लागला. या घटनेनंतर अकोट ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहनावर दगडफेक करणाऱ्यांविरोधात कारवाई केली आहे.

जेमतेम ३०० लोकसंख्या असलेले बल्लारखेड हे कोरकू आदिवासी बहुल गाव अकोट शहरापासून २० किलो मीटर अंतरावर आहे. हे गाव चर्चेत आले ते येथून जवळच असलेल्या १०३२ क्रमांकाच्या वन खंडातील वस्तापूर नियत क्षेत्रातील रात्री नव्हे, दिवसा कारवाई करा संपूर्ण गाव दहशतीत आहे. वन विभागाचे अधिकारी कधीही कोणालाही केव्हाही ताब्यात घेऊन जातील, हे सांगता येत नाही. ही कारवाई दिवसा करा, एवढीच आमची मागणी आहे.रात्री दहशत निर्माण करू नये. – कृष्णा बेलसरे, उपसरपंच, बल्लारखेड.

# महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम कृष्णा यांचं निधन

## बंगळुरूत घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०बंगळुरू –**

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री,



परराष्ट्र मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम कृष्णा यांचं निधन झालं आहे. पहाटे २.४५ मिनिटांनी बंगळुरूतील त्यांच्या राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. एस.एम कृष्णा यांचा जन्म १९३२ साली झाला होता. त्यांचे पूर्ण नाव सोमनाहल्ली मल्लैया कृष्णा असं होते. १९९९ ते २००४ या काळात ते कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. २००४ ते २००८ या कालावधीत त्यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून काम केले. २००९ साली एस.एम कृष्णा तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या केंद्रीय कॅबिनेटमध्ये परराष्ट्र मंत्री म्हणून कार्यरत होते.

मार्च २०१७ साली एस.एम कृष्णा यांनी काँग्रेसला रामराम करून भाजपात प्रवेश केला. २०२३ साली केंद्र सरकारने एस.एम कृष्णा यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले. एस.एम कृष्णा यांनी त्यांचे पदवीचे शिक्षण म्हैसूरच्या महाराजा कॉलेजमधून पूर्ण केले. त्यानंतर बंगळुरू येथे सरकारी कॉलेजमधून कायद्याची पदवी घेतली. उच्च शिक्षणासाठी ते पुढे अमेरिकेत गेले. तिथून परतल्यानंतर ते भारतीय राजकारणात सक्रीय झाले. १९६२ साली ते पहिल्यांदा कर्नाटक विधानसभेत आमदार म्हणून निवडून आले. कर्नाटकच्या मांड्या लोकसभा मतदारसंघातून ते अनेकदा विजयी झाले. इंदिरा गांधी, राजीव गांधी यांच्या सरकारमध्ये त्यांनी मंत्री म्हणून काम केले. १९८३–८४ मध्ये इंदिरा गांधी आणि १९८४–८५ च्या राजीव गांधी यांच्या सरकारमध्ये ते उद्योग आणि अर्थ राज्यमंत्री होते.

**कसा होता राजकीय प्रवास?** १९६२ साली एस.एम कृष्णा हे कर्नाटकच्या मद्दूर विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडून आले त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा पराभव केला होता. जिंकल्यानंतर त्यांनी प्रजा सोशलिस्ट पार्टीत प्रवेश घेतला. १९६८ साली मांड्या लोकसभा पोटनिवडणुकीत ते विजयी झाले. त्यानंतर कृष्णा यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. १९७१ साली मांड्या लोकसभा मतदारसंघातून ते पुन्हा निवडून आले. १९८५ मध्ये ते पुन्हा राज्याच्या राजकारणात परतले. तिथे १९९९ ते २००४ पर्यंत कर्नाटकात ते मुख्यमंत्री राहिले. डिसेंबर २००४ ते २००८ काळात ते महाराष्ट्राचे राज्यपाल होते. पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या सरकारमध्ये ते परराष्ट्र मंत्री होते. जानेवारी २०२३ मध्ये एस.एम कृष्णा यांनी सक्रीय राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली.

### पंतप्रधान मोदींनी वाहिली श्रद्धांजली

दरम्यान, एस.एम कृष्णा यांच्या निधनानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे. एस.एम कृष्णा यांनी त्यांच्या कारकिर्दीत उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या कार्याचे सर्वच स्तरातून कौतुक होते. कर्नाटकात मुख्यमंत्री असताना त्यांनी पायाभूत सुविधांच्या विकासावर लक्ष केंद्रीत केले होते. गेल्या अनेक वर्षात मला एस.एम कृष्णा यांच्याशी संवाद साधण्याची अनेकदा संधी मिळाली. त्या चर्चा कायम स्मरणात राहतील. त्यांच्या जाण्यानं मला खूप दु:ख झालं आहे. त्यांच्या कुटुंबाप्रती माझ्या संवेदना आहेत असं मोदींनी ट्विट करून म्हटलं.

# यवतमाळातील घनकचऱ्यावर प्रक्रियाच नाही

## प्रदूषणामुळे आरोग्य, पर्यावरणाला धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१० यवतमाळ–** शहराचा विस्तार झाला. नगरपरिषदेमध्ये सात ग्रामपंचायती २०१६ मध्ये समाविष्ट झाल्या. तरीही शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न कायम आहे. नगरपालिकेकडे सावरगड कचरा डेपो वगळता इतर कुठलीही हक्काची जागा नाही. थोडी बहुत शेती भाडेपट्ट्यावर घेऊन संपूर्ण कचरा वन विभागाच्या हद्दीत फेकला जात आहे. कचरा उघड्यावर टाकायचा, तो जाळून नष्ट करायचा असा प्रकार सुरू आहे. यामुळे मानवी आरोग्यासह पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे.यवतमाळ शहरात एकूण २८ प्रभाग आहे. येथे दिवसाला ११० मेट्रिक टन घनकचरा निघतो. या घनकचऱ्याचे नियोजन करण्यासाठी चार झोन तयार केले आहे. त्यापैकी झोन क्र. १ व ४ येथे निघणारा घनकचरा बेमुर्वतपणे कोणतेही नियम न पाळता उघड्यावर फेकला जात आहे. यवतमाळकरांची घाण टाकळी जंगल परिसर व शेतशिवारात सोडण्यात येत आहे. यातून टाकळी तलाव भविष्यात दूषित होण्याच्या स्थितीत आला आहे. नगरपरिषदेने स्वच्छ व सुंदर शहरासाठी वर्षाला १२ कोटी रुपयांचे कंत्राट दिले आहे. शहरातून घंटागाडी, ट्रॅक्टर या माध्यमातून कचरा संकलन केले जाते. अर्थात ही प्रक्रिया पूर्ण नियंत्रणात नाही. काही भागात घंटागाड्या चार दिवस पोहोचत नाही. अशा वेळी परिसरातील



नागरिक कचरा उघड्यावर टाकतात. दुर्गंधी सुटायला लागली की, कधी तरी ट्रॅक्टर किंवा घंटागाडी येऊन तो कचरा घेऊन जातात. टाकळी येथे कचरा टाकण्यासाठी जाण्यास योग्य रस्ता नाही. त्यामुळे पावसाळ्यात बरेचदा जागा मिळेल त्या ठिकाणी कचऱ्याचे ट्रॅक्टर, घंटागाडी रिकामी केली जाते. यामुळे यवतमाळ शहराच्याच पिंपळगाव परिसरात दुर्गंधी निर्माण होते.

पर्यावरण प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडून घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी निकष ठरवून देण्यात आले आहे. या अधीन राहूनच नगरपरिषदेला केंद्र सरकारकडून वित्त आयोगाचा निधी प्राप्त होतो. प्रत्यक्षात मात्र प्रदूषण नियंत्रण बोर्डाचे निकष पायदळी तुडविले जात आहे. यातूनच ही समस्या उभी ठाकली आहे.

### कुजलेली जनावरे उघड्यावर

शहरात भटके कुत्रे, डुक्कर, जनावरे यांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचे मृतदेह खोल खड्डा करून जमिनीत पुरणे अपेक्षित आहे. असे न करता ट्रॅक्टरमध्ये मेलेल्या प्राण्यांना टाकून थेट टाकळी जंगल परिसरात फेकले जात आहे.

### रुग्णालयातील कचरा उघड्यावर

रुग्णालयातून वॉर्डात उरलेले अन्न, फळांच्या साली व इतर कचरा नग रपालिका उचलते. या कचऱ्या– सोबत जैविक कचराही आणला जात आहे. हा कचरासुद्धा उघड्यावर जंगल परिसरात फेकण्यात येत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले दिलेले वचन पूर्ण

## ३८८ किमी दूर पोहोचले लग्नाला

**दि.१०अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी एका लग्न समारंभात पोहोचले. हा विवाह ८ वर्षांपूर्वी अत्याचारानंतर खून झालेल्या पीडितेच्या बहिणीचा विवाह होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लग्नाची जबाबदारी घेण्याचे आश्वासन दिलं होतं. त्यानुसार देवेंद्र फडणवीस यांनी या लग्नाला हजेरी लावली आणि नव दाम्पत्याला आशीर्वाद दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी पीडित कुटुंबाला आश्वासन दिले होते की ते त्यांच्या मुलीच्या लग्नाची जबाबदारी घेतील आणि स्वतः लग्न समारंभाला उपस्थित राहतील. विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी त्यांच्या पोस्टमधून ही माहिती दिली आहे.

अहिल्यानगरमध्ये आयोजित एका विवाह सोहळ्याला मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित होते. २०१६ मध्ये कोपर्डी बलात्कार आणि खून पीडितेच्या बहिणीच्या लग्नाची



जबाबदारी घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. या लग्नाला हजर राहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ८ वर्ष जुने वचन पूर्ण केले. तत्पूर्वी, ५ डिसेंबर रोजी पदभार स्वीकारल्यानंतर, बोन मॅरो प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णाला ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या प्रस्तावावर देवेंद्र फडणवीस यांनी सर्वात आधी स्वाक्षरी केली. पुणे येथील रहिवासी चंद्रकांत कुऱ्हाडे यांच्या उपचारासाठी ही मदत देण्यात आली होती. चंद्रकांत यांच्या पत्नीने मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीचे आवाहन केले होते, ते मुख्यमंत्र्यांनी तातडीने स्वीकारले.

कोपर्डीत ८ वर्षांपूर्वी एक दुर्दैवी घटना घडली होती. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यावेळी मुख्यमंत्री म्हणून पीडित कुटुंबीयांशी संवाद साधला होता.

# कापूसही रुसला; सोयाबीनला मिळतोय हमीपेक्षा कमी भाव

## शेतकऱ्याची चिंता वाढली : कापूस लागवडीचा खर्चही निघेना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०पुसद :** शेतकऱ्यांचे नगदी पीक म्हणून ओळखले जाणारे कापूस व सोयाबीन सध्या चांगले भाव मिळण्याच्या प्रतीक्षेत असून, कापूस व सोयाबीनचा भाव वाढत आहे ही केवळ चर्चाच आहे. सोयाबीनला व कापसाला चांगला भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंता व्यक्त करू लागले आहेत.पुसद तालुक्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन व कापूस उत्पादन घेतले जाते. ही संख्या मोठी असली, तरी यंदाच्या वर्षात पूर व खराब वातावरणामुळे सोयाबीनचे चांगले उत्पादन



मिळाले नाही. शिवाय कमी उत्पादन असताना भाव देखील ३ हजार हजार ३०० पासून ४ हजार २०० पर्यंत एवढा कमी प्रति क्विंटलला मिळत आहे. मागील दसरा, दिवाळी सणापासून सोयाबीनच्या दरामध्ये वाढ झाली नाही. त्यामुळे पुसद बाजार समितीचे आवारामध्ये मोठ्या प्रमाणात व्यापाऱ्यांच्या आडतीसमोर सोयाबीनचे ढीग दिसून येत आहेत. एकंदरच बाजारभाव हा ४ हजार २०० ते ३०० च्या वर जायला तयार नाही, तर आज ना उद्या भाववाढ होईल या आशेवर शेतकऱ्यांनी आपले सोयाबीन तसेच ठेवले आहे. दुसरीकडे सोयाबीनवर शेतकऱ्यांनी अगोदरच उचल घेतलेली राहते, त्या उचलीची परतफेड करणे व नवीन ताळेबंद बसविणे यामध्ये बळीराजा गुंतलेला दिसतो. परंतु यावर्षी बाजारपेठेत सोयाबीनचे दर पडलेले असल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.निसर्गाच्या लहरीपणामुळे गत वर्षीच्या तुलनेत यावर्षी पुसद तालुक्यात खरीप हंगामातील सोयाबीनचे उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्या तुलनेत सोयाबीनचे बाजारातील दर वाढणे अपेक्षित होते. मात्र तसे झाले नाही. त्यामुळे खर्च जास्त आणी उत्पन्न कमी अशी गत झाल्यामुळे सोयाबीन पिक शेतकऱ्यांना परवडले नाही. .


### आता अपेक्षा तुरीच्या पिकाकडून

सध्या तुरीचे पीक जोमात बहरलेले आहे. तुरीच्या पिकातून तरी हाती काही पडेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. दरम्यान, सध्या अनेक भागात ढगाळ वातावरण आहे. याचा फटका बहरुन आलेल्या तुरीच्या पिकाला बसू नये अपेक्षाही शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# पाच कोटी भाविक कुंभमेळ्याला येतील, पोलिसांचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१०नाशिक :**शहराच्या प्रशासकीय यंत्रणेला सिंहस्थ कुंभमेळ्याची चाहूल लागण्यास सुरुवात झाली आहे. पोलिस प्रशासनाकडूनही



जिल्हाधिकाऱ्यांकडे 'झीरो कॅज्युल्टी, सेफ सिंहस्थ मेळा–२०२६–२७' आराखडा सादर करण्यात आला आहे. यानुसार २०२७ साली नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यात तीन पर्वणी मिळून तीन ते पाच कोटी भाविक हजेरी लावणार असल्याचा अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. दर बारा वर्षांनी गोदाकाठी हा मेळा भरतो. देशभरातून नव्हे, तर विदेशातूनसुद्धा भाविक याठिकाणी हजेरी लावतात. साधू–संतांची यावेळी मांदियाळी असते. नाशिक शहरात २०१५ साली ८० लाख भाविकांनी हजेरी लावली होती. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न यावेळी उद्भवू नये, यासाठी आतापासून पोलिस प्रशासनाकडून नियोजन व तयारी करण्यावर भर दिला जात आहे. त्यासाठी पोलिसांना केंद्रीय सशस्त्र पोलिस दलाच्या अतिरिक्त कुमकसह २५ हजार पोलिसांचा फौजफाटा लागणार आहे. १,११२ कोटी निधीची गरज पोलिस प्रशासनाकडून १,११२ कोटी १८ लाख रुपयांचा निधी वास्तविक आवश्यक खर्च म्हणून आराखड्यात दाखविला आहे.

# सलग चौथ्यांदा रेकॉर्ड मताने निवडून आलेले जनता जनार्दनाचे सेवक रवी राणा यांना मंत्रीपद देगा देवा

## अंबादेवी-एकविरादेवींना घातले साकडे : शहर आणि जिल्ह्यातील शेकडो नागरिकांच्या वतीने महाआरती



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या जनसेवेने अमरावती जिल्ह्याचे नाव लौकीक करणारे सलग चौथ्यांदा रेकॉर्ड मताने निवडून आलेले जनता जनार्दनाचे सेवक म्हणून चौवीस तास राबणारे रवी राणा यांना महायुतीच्या देवेंद्र फडणवीस शासनामध्ये कॅबिनेट मंत्री पद मिळावे आणि अमरावती जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा पालकमंत्री पदी विराजमान करण्यासाठी मंगळवारी जिल्ह्यातील सैकडो नागरिकांच्या वतीने अँड. सागर महाराज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत विदर्भ कुलस्वामिनी मां अंबादेवी आणि एकविरा देवीची मनोभावे महाआरती करण्यात आली. मागील १६-१७ वर्षापासून सतत जनसेवेचे व्रत पाळत रवी राणा बारा महिने चौवीस तास माई बाप जनतेच्या सेवेत असतात. लाडक्या बहीणी व सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी सहजपणे उपलब्ध राहणारे रवी राणा यांना यावेळी अमरावती जिल्ह्यातील सर्वात ज्येष्ठ आमदार म्हणून यावेळी महायुतीच्या शासनामध्ये कॅबिनेट मंत्री पद देण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील सैकडो नागरिकांच्या वतीने मां अंबादेवी आणि एकविरा देवी मंदिरात महाआरती करण्यात आली. जिल्हा प्रशासन गतिमान करण्यासोबतच सर्वांगीण विकासासाठी आणि संपूर्ण अमरावती जिल्ह्यातील जनता जनार्दनाच्या समस्या सोडविण्यासाठी रवी राणा हेच अमरावती जिल्ह्यांचे नवीन पालकमंत्री व्हावे. अशी विनवणी देखील अंबादेवी आणि एकविरा देवी यांना सैकडो समर्थकांनी केली.अँड. सागर महाराज देशमुख, समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पीभैय्या जाजोदिया, सुनील भाऊ राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न या महाआरती प्रसंगीसमवेत सैकडो नागरिक आणि लाडक्या बहीणी स्वयं स्फूर्तीने सहभागी झाले.

# मुंबईत मद्यधुंद बसचालकाने ३०-४० वाहनांना चिरडले

## ७ ठार, ४९ जखमी, मुख्यमंत्र्यांकडून मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत जाहीर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१० मुंबई**

कुर्ल्यातील लालबहादूर शास्त्री (एलबीएस) मार्गावरील आंबेडकरनगर भागात 'बेस्ट' शहर वाहतूक सेवेच्या बसने ३० ते ४० वाहनांना ठोकरले. यात ७ जणांचा मृत्यू झाला तर ४९ जण जखमी झाले आहेत. सोमवारी रात्री १० वाजेच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. जखमींना भाभा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. प्रत्यक्षदर्शी नागरिकांच्या माहितीनुसार, अपघातग्रस्त बस इलेक्ट्रिक वाहन होते. कुर्ला स्टेशनहून येणाऱ्या या बसचा चालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता. अर्पण हॉस्पिटलजवळ त्याचे नियंत्रण सुटले व सुमारे ५०० मीटरपर्यंत त्याने रस्त्यावरील ३० ते ४० वाहनांना ठोकरले. यात पाच ते सहा ऑटो रिक्षांचा चक्काचूर झाला.

### मुख्यमंत्र्यांकडून मदत जाहीर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कुर्ला येथे बेस्ट बसच्या अपघातात काही लोकांचे मृत्यू झाले, त्याबद्दल तीव्र दुःख व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, यासाठी मी प्रार्थना करतो, असेही त्यांनी म्हटले आहे. या घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले आहे. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने करण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे.

### बसचालक पोलिसांच्या ताब्यात, चौकशी सुरू

अचानक अनियंत्रित झाल्याने क्षणार्धात काय झाले हे चालकालाही कळले नाही. एका कोपऱ्यात जाऊन बस धडकल्यानंतर जमावाने त्याला खाली ओढले. मात्र पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून चालकाला ताब्यात घेतले. तो खरेच दारू प्यालेला होता का, याची खात्री करण्यासाठी वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. मनपाच्या अधिकाऱ्यांनीही घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन जवान मदतीला धावून आले.

# किल्ले गाविलगड येथे शौर्यदिन,मातृवंदना आणि मेळघाट परिषदेचे आयोजन




## स्वराज्य सेवा प्रतिष्ठान द्वारा अभिनेते भारत गणेशपुरे आणि रंजनाताई मामर्डे यांना सन्मानित करण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१०अमरावती**

दरवर्षीप्रमाणे यंदाही चिखलदरा येथे गाविलगड शौर्यदिन व मातृवंदना कार्यक्रमाचे औचित्य साधून मेळघाट परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांना वऱ्हाड भूषण तर विदर्भ आंदोलन समितीच्या अध्वर्यू रंजनाताई मामर्डे यांना विदर्भ वीरांगना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.किल्ले गाविलगड येथे होणाऱ्या या सोहळ्यातील शौर्य दिन व मातृवंदना कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ.पृथ्वीराजसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली किल्लेदार राजा भैय्या ठाकूर व प्रदीपसिंह ठाकुर यांच्या विशेष उपस्थितीत होणार आहे.उद्घाटक म्हणून अभिनेते भारत गणेशपुरे,प्रमुख वक्ते किशोर वानखडे,प्रमुख पाहुणे डॉ.के.एम.कुलकर्णी, खासदार डॉ.अनिल बोंडे,आमदार केवलराम काळे, प्राचार्य शक्तीसिंह राजपूत,माजी आमदार जगदीश गुप्ता,चिखलदरा नगर परिषदेचे माजी अध्यक्ष राजेंद्रसिंह सोमवंशी,भारतीय विद्यामंदिर अमरावतीचे सरचिटणीस अनंतराव सोमवंशी, नगरपरिषद चिखलदऱ्याचे माजी उपाध्यक्ष अब्दुल शेख,अरुण तायडे,अविनाश कोठाळे,संभाजीनगर येथील उद्योजक अशोक चिनागी,नलिनीताई चिनागी,राजेंद्र गोरले,समाजसेवक चंद्रकांत पाटील या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या प्रसंगी समाजाच्या विविध क्षेत्रात आपले अमूल्य योगदान देणाऱ्या सेवावृत्तींचा स्वराज्य सेवा प्रतिष्ठान द्वारे सेवा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे. या मध्ये सुप्रसिद्ध नुरोलोजीस्ट डॉ.सिकंदर अडवाणी,बँक ऑफ महाराष्ट्रचे ग्रामीण क्षेत्राचे चेअरमन मिलिंद घारड, महात्मा गांधी संशोधन केंद्र संशोधन केंद्र वर्धा येथील संचालक दीपकुमार वर्मा,डोमटेक आर्ट प्रायव्हेट लिमिटेड पुण्याचे संचालक सुनील काळे, मोर्शी येथील उत्कृष्ट शेतकरी गजानन बारबुद्धे, जैतादेही जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र राठी,साई कोचिंग क्लासेसचे संचालक दिलीप हटवार,माहेर फाउंडेशनच्या संचालिका दीपाताई तायडे,ग्रामोद्धार सेवाव्रती दिलीप ठाकरे, राजर्षी शाहू महाराज वाचनालयाचे संचालक राहुल घडांगे,संत गाडगेबाबा अमरावती इतिहास मंडळ अध्यक्ष प्रा.डॉ.संतोष बनसोड,सिने दिग्दर्शक अनुराग दळवी,हर्षदा स्कूल ऑफ क्लासिकल डान्सच्या संचालिका सौ.हर्षदा पनके,राष्ट्रिय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष निलेश जामठे,दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी किशोर मेटे,शांतनू डाहे (पोलवॉल्ट) आणि निषाद शेख (लॉन टेनिस) यांना त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सोबतच जाणीव फाउंडेशन धामणगाव गडी या संस्थेस उत्कृष्ट पर्यावरण पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.सातपुड्याच्या कुशीतील मेळघाटच्या परिपूर्ण परिसंस्थेशी निगडित पर्यावरण,वनसंपदा,प्राणी विश्व,आदीम संस्कृती,बोलीभाषा,शेती,इतिहास इत्यादी विषयांवर मेळघाट परिषदचे आयोजन करण्यात आलेले आहे. या परिषदेत प्रसिद्ध साहित्यिक अशोक मानकर,प्रा.डॉ.संतोष बनसोड, प्रा.डॉ.काशिनाथ बऱ्हाटे,प्रा.डॉ.गोविंद तिरमनवार, प्राचार्य डॉ.एकनाथ तट्टे,सतीश झामरे या तज्ज्ञांचे विविध विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.





# भक्तांना आश्रय व मनशांती देणारे तिर्थक्षेत्र निर्माण करणार - खा. अनिल बोंडे

## संत काशीनाथ बाबा पुण्यतिथी महोत्सवाच्या मंडपाचे भूमिपूजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नांदगाव पेठ**

संत काशिनाथ बाबा यांचे अनेक चमत्कार आणि साक्षात्कार पंचक्रोशीतील भक्तांनी अनुभवले आहे.ही महान विभूती भक्तांसाठी मोठा आधार आहे.संत काशिनाथ महाराजांचे सध्या क दर्जाचे तीर्थक्षेत्र असून हे तीर्थक्षेत्र ब करण्यासाठी आपण प्रयत्न करू शिवाय भाविक भक्तांना आश्रय आणि मनशांती देणारे तीर्थक्षेत्र निर्माण करण्यावर आपला भर असणार असे प्रतिपादन राज्यसभा खा.डॉ.अनिल बोंडे यांनी केले. संत काशीनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाच्या मंडपाचे रविवारी खा. बोंडे यांच्या हस्ते भूमीपूजन करण्यात आले यावेळी ते बोलत होते. संत काशिनाथ बाबा यांचा १९ वा पुण्यतिथी महोत्सव ४ जानेवारी पासून सुरू होणार आहे.त्यानिमित्त रविवारी सायंकाळी ५ वाजता नाफडे पेट्रोल पंप जवळील संत काशिनाथ धाम येथे मंडप भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.याप्रसंगी उदघाटक म्हणून खा.डॉ. अनिल बोंडे, वसुधा बोंडे,विवेक गुल्हाने, शिवराजसिंह राठोड,शालीग्राम महाराज खेडकर,विपुल पालिवाल, संदीप यावले, दिनेश चौधरी, विजय कापडे, छत्रपती पटके,भाऊराव कापडे,शरद भगत, संतोष गाडेकर, अभिलाष मानेकर,प्रा. मोरेश्वर इंगळे,भाजपचे सचिन इंगळे,सिंधू डोईफोडे,अमोल व्यवहारे,राजेंद्र तुळे, मनोज हटवार, अरुण राऊत,निलेश मरोडकर, गोलू शेंदरकर यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. खा.अनिल बोंडे यांनी मंदिरात जाऊन संत काशिनाथ महाराज यांचे मनोभावे दर्शन घेतले.त्यानंतर संत काशिनाथ धाम येथे मंडपाचे भूमिपूजन करून भक्तांना संबोधित केले.पुढे बोलतांना ते म्हणाले की,संत काशिनाथ धाम येथे भाविकांनी श्रमदान करून हा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत करावी तसेच पुण्यतिथी महोत्सव काळात पोलीस प्रशासनाने देखील चोख बंदोबस्त करावा.खा.बोंडे यांनी पाच कोटी रुपयांचा निधी देण्याचीही यावेळी घोषणा केली तसेच काशिनाथ धाम ला विरोध करणाऱ्यांना देखील भेटून त्यांचाही हातभार या धर्म कार्यात लागेल असेही त्यांनी भाविकांना आश्वस्त केले. मागील वर्षी पासून संत काशिनाथ धाम याठिकाणी पुण्यतिथी महोत्सव साजरा होत असून यावर्षी सुद्धा अत्यंत चांगल्या प्रकारे पुण्यतिथी महोत्सव साजरा होईल तसेच खा.अनिल बोंडे यांनी आमचे निमंत्रण स्वीकारून याठिकाणी उपस्थिती दर्शविली तसेच भाविक भक्तांना विश्वास देऊन याठिकाणी काशिनाथ धाम निर्माण करण्यासंदर्भात आश्वासन दिले त्याबद्दल भाविकांच्या वतीने व संत काशिनाथ बाबा देवस्थानच्या वतीने मंदिराचे विश्वस्त शिवराजसिंह राठोड यांनी आभार व्यक्त केले.

### संस्थानचे कार्य कौतुकास्पद


गेल्या १८ वर्षांपासून संत काशिनाथ महाराज पुण्यतिथी महोत्सव अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडतो आहे याचे सर्वस्वी श्रेय संस्थानचे आहे. संत काशिनाथ बाबा ग्रामदैवत असून त्यांना कुणीही कोणत्याही पक्षाशी जोडू नये.मंडप भूमिपूजन कार्यक्रम बॅनरवर स्वतःचे फोटो टाकून आपण ग्रामदैवतांचे महत्व कमी होणार नाही याची सर्वांनी काळजी घेणे सुद्धा तेवढेच गरजेचे आहे.यासाठी संस्थानने सुद्धा प्रतिबंध घालणे आवश्यक असल्याचेमत प्रा. मोरेश्वर इंगळे यांनी व्यक्त केले.




# महात्मा फुले समाजसेवा पुरस्कार वितरण समारंभाचे ५ जानेवारीला आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

सर्व शाखीय माळी संघ अमरावती द्वारा आयोजित २९ वे बहुराज्यस्तरीय सर्व शाखीय माळी समाज उपवर युवक-युवती ऋणानुबंध परिचय महासंमेलन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक सभागृह अमरावती येथे ५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेले आहे. याप्रसंगी सुमारे ३००० पेक्षा अधिक उपवर युवक-युवतींची नोंदणी असलेले 'ऋणानुबंध' या परिचय पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येत आहे .ज्या संघटनांनी ५० पेक्षा अधिक परिचय पत्र घरोघरी जाऊन गोळा केलेले आहेत तसेच शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील रचनात्मक विधायक कामात भरीव योगदान दिल्याच्या गौरवार्थ अशा संघटकांचे शाल, श्रीफळ, स्व. पुरुषोत्तम वासनकर गुरुजी स्मृती चिन्ह ,प्रा. श्रीकृष्ण बनसोड लिखित 'विद्रोही महात्मा' व 'ऋणानुबंध' देऊन त्यांना महात्मा फुले समाजसेवा पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. यासाठी संस्थापक महासचिव प्रा.श्रीकृष्ण बनसोड, ऋणानुबंध चे कार्यकारी संपादक प्रा. नंदकिशोर होले, सहसचिव व राज्य पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक प्रदीप लांडे यांच्या समितीमार्फत महात्मा फुले समाजसेवा पुरस्कार विजेत्यांची नावे जाहीर केले जाणार आहेत. तरी विवाह इच्छुकांनी या संमेलनामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान संस्थाध्यक्ष डॉ. गणेश खारकर , उपाध्यक्ष बबनराव पाटील, से.नि.कार्यकारी अभियंता भरत खासबागे, से.नि. पोलीस अधिकारी ओमप्रकाश अंबाडकर ,से.नि. लेखाधिकारी वसंत भडके ,उद्योजक नंदकुमार वाठ,प्राचार्य निळकंठ बोरोळे, सामाजिक कार्यकर्ते दिगंबर यावतकर, से.नि. बँक मॅनेजर मधुकर आखरे , ह.भ.प. गोविंद फसाटे ,प्रा. साहेबराव निमकर, माळी वैभव चे कार्यकारी संचालक अनिल भगत, मरार चे अध्यक्ष रामकुमार खैरे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



# यूपी-राजस्थानसह १० राज्यांत थंडीची लाट

## केदारनाथ आणि बद्रीनाथ धाम बर्फाच्छादित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१० हिमाचल**

हिमालयाच्या वरच्या भागात सुरू झालेल्या हिमवृष्टीचा परिणाम मैदानी राज्यांपर्यंत पोहोचला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये गेल्या चार दिवसांपासून बर्फवृष्टीनंतर थंडी वाढली आहे.

मंगळवारी बर्फाळ वाऱ्यांच्या प्रभावामुळे सौराष्ट्र, कच्छ, हरियाणा, दिल्ली, चंदीगड, राजस्थान, उत्तर प्रदेश, पंजाब, जम्मू-काश्मीर, लडाख, उत्तराखंडमध्ये थंडीची लाट सुरू आहे.

त्याच वेळी, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड, बंगाल, सिक्कीम, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरामध्ये दाट धुके आहे.




सोमवारी, श्रीनगरमध्ये हंगामातील सर्वात कमी तापमान -५.४ओ नोंदवले गेले, तर सोनमर्ग येथे -९.७ओ इतके थंड होते. गुलमर्गमध्ये पारा -९.० अंश सेल्सिअस नोंदवला गेला.

उत्तराखंडच्या केदारनाथ आणि बद्रीनाथ धाममध्ये सोमवारी हंगामातील पहिला हिमवर्षाव झाला. यानंतर राज्य सरकारने दोन्ही ठिकाणी सुरू असलेली विकासकामे थांबवली आहेत.

दक्षिण भारतात पुन्हा एकदा पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कर्नाटकमध्ये आज वादळी वाऱ्यासह पाऊस पडू शकतो.

# बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व अन्य अल्पसंख्यकांवर होणाऱ्या अत्याचारांचा निषेधार्थ अमरावतीत विशाल जनआक्रोश मोर्चा














**बांगलादेशातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन व अन्य अल्पसंख्यकांवर होणाऱ्या अत्याचारांचा निषेधकरण्याकरीता आज मंगळवार रोजी विशाल जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला या मोर्चाने अमरावती जिल्ह्यात पुन्हा एकदा समस्त हिंदू एकतेचे दर्शन घडविले आहे. सकल हिंदू समाजातील विविध मठ, मंदिरे, अध्यात्मिक व धार्मिक संस्था व संस्थान, भजनी मंडळे, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला बचत गट, सार्वजनिक उत्सव मंडळ, ज्ञाती संस्था, मान्यवर साधू, संत, कीर्तनकार, प्रवचनकार, महाराज मंडळी व अन्य सामाजिक संस्थांचे प्रमुख व प्रतिनिधी, सर्व मातृशक्ती एकत्र येत या विशाल जनआक्रोश मोर्चात सहभागी झाले होते**

**दुपारी ४ वाजता जयस्तंभ चौक येथील गांधी पुतळा येथून या मोर्चाला सुरवात झाली त्यांनतर जयस्तंभ चौक ,जवाहर गेट मार्ग - बापट चौक - श्याम चौक - राजकमल चौक या मार्गाने निषेध मोर्चा काढण्यात आला. त्यानंतर राजकमल चौकात निषेध सभेने समारोप करण्यात आला. या जनआक्रोश मोर्चात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेत बांगलादेशाचा निषेध नोंदविला.**

# हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धेच्या प्रचार प्रसार कार्यालयाचे थाटात उद्घाटन

## स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीवासी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीच्या निमित्ताने २५ डिसेंबर रोजी होणाऱ्या हाफ मॅरेथॉन अटल दौड स्पर्धेसाठी स्पर्धकांना नाव नोंदणी करता यावी तसेच स्पर्धे बाबतची माहिती मिळावी, यासाठी गुलशन प्लाझा जवळ , मंत्री मोटर्स सोमोर ,राजापेठ चौक रोड अमरावती येथे मुख्य मॅरेथॉन कार्यालय सुरू करण्यातआलेआहे.



अमरावती विभागीय क्रीडा उपसंचालक श्री विजय संतान सोबतच गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष तुषार भारतीय , कुबडे ज्वेलर्स संचालक समीर कुबडे , माजी महापौर चेतन गावंडे , अमरावती जिल्हा अथलेटिक संघाचे सचिव अतुल पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यालयाचे उद्घाटन झाले.यावेळी हस्ते मॅरेथॉन स्पर्धेचा पहिला अर्ज देण्यात आला. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धाकांना प्रवेश अर्जवाटप, त्यांची स्वीकृती, अर्जांची छाननी, स्पर्धकांना चेस्ट नंबरचे वाटप, स्पर्धेपूर्वी बैठकाअशी मॅरेथॉनशी निगडीत असलेली विविध कामे या कार्यालयातून होणार आहे.

अटल दौड हाफ मॅरेथॉन स्पर्धा ही आज राज्यस्तरीय स्पर्धा आहे परंतु येणाऱ्या काळात राष्ट्रीय पातळीवर ही स्पर्धा जाईल असा विश्वास क्रीडा उपसंचालक श्री विजय संतान यांनी व्यक्त केला .

अटल दौड राज्यस्तरीय हाफ मॅरेथॉन स्पर्धा दरवर्षी मोठ्या उत्साहाने साजरा होतो , परंतु यावर्षी अटलजींची जन्मशताब्दी असल्यामुळे खऱ्या अर्थाने अटलजींच्या कार्याला श्रद्धांजली भावरांजली अर्पण करण्याच्या दृष्टीने सर्व स्पर्धकांनी या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा सोबतच येणाऱ्या काळामध्ये विविध उपक्रम व कार्यक्रम आयोजित करून अटलजींच्या स्मृतीची आठवण वर्षभर करण्याचा निर्धार यावेळी मुख्य आयोजक श्री तुषार भारतीय यांनी व्यक्त केला. समाजाच्या सर्वांगीण स्वास्थ्यासाठी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था सातत्याने प्रयत्नशील राहिली आहे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य उत्तम असेल तर विचार सकारात्मक राहतात आणि समाज म्हणून आपला खऱ्या अर्थाने विकास होतो अशी भूमिका मॅरेथॉन अटल दोष स्पर्धेच्या आयोजना मागील आहे , असे आयोजक तुषार भारतीय यांनी आयोजना मागची भूमिका स्पष्ट केली. भारताचे माजी प्रधानमंत्री स्वर्गवासी भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षात निमित्य आयोजित केलेल्या या मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी या http://www.ataldaud.com वेबपोर्टर वर नोंदणी करावी. असे आव्हान तुषार भारतीय मित्रपरिवार च्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा अतुल पाटील सर यांनी केले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन मंदार नानोटी यांनी केलेकार्यक्रमाला विशेष करून प्रशांत शेंगोकर , सचिन मोहोड , राजेश जगताप , माजी नगरसेवक श्री बलदेव बजाज , सौ सुरेखा लुंगारे , सौ सुनंदा खरड , सौ लता देशमुख , रमेश मोहळे , ऋषीकेश चौबे , आशिष अतकरे , सुधीर पावडे , मेजर तुळराम चांदेकर , , आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# ‘निमा’ ची वास्तू संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरेल - प्रविण पोटे पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

‘निमा’ (नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन) अमरावती शाखा नवनियोजित वास्तूचा भूमिपूजन सोहळा मोठ्याउत्साहात माजी राज्यमंत्री मा.आ. प्रविण पोटे पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन चे माजी अध्यक्ष डॉ. दिनेश गवळी तर विशेष अतिथी म्हणून श्रेयसदादा पोटे पाटील उपस्थित होते. धन्वंतरी पूजनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.निमाच्या कार्यातून केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे, तर समाजाच्या सेवेतही योगदान देण्याचे आवाहन प्रविण पोटे पाटील यांनी केले तसेच भविष्यात निमाची वास्तू संपूर्ण समाजासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास यावेळी प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केला.यावेळी मंचावर निमा अध्यक्ष डॉ. प्रवीण औगड,निमा राज्य कार्यकारणीचे डॉ. दीपक पोच्ची, डॉ. स्वप्नील घाटोळ, निमा आयुर्वेद फोरमचे राज्याध्यक्ष डॉ. अमोल ढवळी, डॉ. कमल राऊत, डॉ. राजेश उताणे, निमा आयुर्वेद फोरमचे अध्यक्ष डॉ. उन्मेश डालके, निमा वुमन्स फोरमच्या अध्यक्षा डॉ. प्रेमा चौधरी, निमा सचिव डॉ. पंकज कावरे हे उपस्थित होते.



या भूमिपूजन सोहळ्याला निमा माजी राज्यसचिव डॉ. अनिल बाजारे, डॉ. अजमिरे, डॉ अजय डकरे, डॉ. विनोद रोडे, डॉ. अटल तिवारी, डॉ. विनोद मेहत्रे, डॉ. अनिल जावरकर, डॉ. मुरलीधर खारोडे, डॉ. सुरेश पोधाडे, डॉ. सुनील लांडे, डॉक्टर अजय गुडधे, डॉ प्रमोद मराठे, डॉ. प्रिया चौधरी, डॉ वर्षा रोडे, योजना बर्डे, डॉ. वैशाली ठवळी, डॉ. राम खरबडे, डॉ. राहुल माहुले डॉ विनोद फुसे, डॉ तुषार पोहनकर, डॉ संदीप पाठबागे , डॉ. आनंद उल्हे, डॉ. उज्वल बारंगे, डॉ. वैशाली बारंगे, डॉ. विपीन टोंगळे, डॉक्टर अमर बोडखे आणि डॉ. स्वाती टोंगळे, राम खरबडे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ ; रेल्वे सुरक्षा दलाने अकराशे मुलांची केली सुटका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

मध्य रेल्वेच्या पाच विभागातील रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे पोलीस आणि इतर रेल्वे कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ अंतर्गत जानेवारी ते नोव्हेंबर या अकरा महिन्यांत १ हजार ९९ मुला-मुलींची सुटका केली आहे.आपल्या आई-वडिलांपासून तातातूट झालेली, घरातून निघून गेलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला-मुलींना पुन्हा आपले आई-वडील, घर मिळावे यासाठी ‘ऑपरेशन नन्हे फरिश्ते’ मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत मध्य रेल्वेच्या सुरक्षा बलाच्या जवानांनी ७४० मुले आणि ३५९ मुलींची सुटका केली आहे.



त्यात मुंबई विभागातून ३७९, भुसावळ विभागातून २४७, पुणे विभागातून २४६, नागपूर विभागातून १६८ आणि सोलापूर विभागातून ५९ मुला-मुलींची सुटा करण्यात आली आहे. गेल्या वर्षी जानेवारी ते नोव्हेंबर या कालावधीत १ हजार ५३ मुला-मुलींना त्यांच्या घरी पोहचविण्यात रेल्वे सुरक्षा बलाच्या जवानांना यश मिळाले होते.भांडणामुळे किंवा काही कौटुंबिक समस्यांमुळे किंवा चांगले जीवन किंवा शहराचे ग्लॅमर आदींच्या शोधात आपल्या कुटुंबीयांना न सांगता रेल्वे स्थानकावर येणारी मुले प्रशिक्षित सुरक्षा रक्षक बलाच्या जवानांना आढळतात. हे प्रशिक्षित कर्मचारी त्यांच्या समस्या समजून घेतात आणि त्यांना त्यांच्या घरी जाण्यासाठी सल्ला देतात.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी, राहुल गांधी, देवेंद्र फडणवीस, आदित्य ठाकरे यांच्यासह प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांनी राजीनामे देऊन बॅलेट पेपरवर निवडणूक घ्या : राजेश मुंदडा

## रोजच्या ईव्हीएमच्या वादाने नागरिक त्रस्त : विरोधकांसह सत्ताधान्याच्या प्रमुखांनीही पुढाकार घ्यावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०अमरावती**

देशात विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा ईव्हीएम बाबतचा बाद सुरू झाला आहे, त्यामुळे सत्ताधारी देखील विकास कामाकडे लक्ष देण्याऐवजी खुलासे देण्यास व्यस्त झाली आहे, दररोजच्या ईव्हीएम च्या वादाला कंटाळत जनतेच्या वतीने राजेश मुंदडा यांनी देशातील प्रमुख नेत्यांना एक विचित्र आव्हान दिलेले आहे, सर्वच पक्षांच्या राजकीय प्रमुख नेत्यांनी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा देऊन बॅलेट वर एकदा निवडणूक लढवून दाखवाच, याकरिता सत्ताधारी व विरोधकांनी देखील एकत्र यावे असे आवाहन त्यांनी पत्रकार परिषदेतून दिले आहे,

टीव्ही सुरू केला की रोजच ईव्हीएम मध्ये घोळ असल्याच्या बातम्या दाखविल्या जातात, सध्या विरोधक बॅलेट पेपर घेण्याकरता सत्ताधा-यांवर दबाव तंत्राचा वापर करीत असून सत्ताधारी देखील इव्हीएम बाबत खुलासे देण्यात व्यस्त झाली आहे मात्र यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत, देशाच्या विकासाकडे लक्ष देण्याऐवजी ईव्हीएम चा वाद आता नागरिकांना देखील डोकेदुखी ठरत आहे, यामुळे देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचा देखील अपमान होत आहे, हा रोजचा सुरू असलेला



वाद एकदा संपुष्ट निकाली काढावा याकरता नागरिकांच्या वतीने राजेश मुंदडा यांनी एक विचित्र आवाहन देशातील प्रमुख नेत्यांना केले आहे, ईव्हीएम चा वाद संपवायचा असेल तर खत्या अथनि पंतप्रधान नरेंद्र मोदी, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, या दोघांनी राजीनामा द्यावा सोबतच महाराष्ट्रात सुप्रिया सुळे, सुनील तटकरे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेसचे नाना पटोले, शिवसेनेचे आदित्य ठाकरे, जितेंद्र आव्हाड, रोहित पवार या प्रमुख नेत्यांनी आपापल्या पदाचा राजीनामा देऊन त्यांच्या मतदारसंघात एकदा बॅलेट पेपरद्वारे मतदान घ्यावे जेणेकरून या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या बॅलेट पेपरच्या निकालावरूनच खऱ्या अर्थाने ईव्हीएम मध्ये घोळ आहे की नाही हे कळेल, याकरता सुरुवातीला विरोधकांनी पुढाकार घेऊन अधीराजीनामे देण्यास तयार आहे याची संमती दर्शवावी तर सत्ताधाऱ्यांनी देखील त्यांच्या संमतीला प्रतिसाद देऊन त्यांनी देखील आपापल्या पदांचा राजीनामा देण्यास तयारी दर्शवावी आणि निवडणूक आयोगाला याबाबत निवडणूक बॅलेट पेपरवर घेण्याबाबत विनंती करावी, निवडणूक आयोग जर बॅलेट पेपरवर निवडणूक कृमया घेत नसेल तर मी स्वतः सर्वोच्च न्यायालयात जाऊन जनहित याचिका दाखल करेल तसेच राष्ट्रपती यांना देखील मी प्रमुख पदाधिकाऱ्याची निवडणूक बॅलेट पेपर घेण्याकरिता विनंती करणार असल्याचे मुंदड़ा म्हणालेत .